# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

YEAR : 37) 15th January 2012 ( No : 01


# महाराष्ट्र शासनाने व मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी दिलेला शब्द पाळला पाहिजे

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १५.०१.२०१२ रोजी जळगाव येथे झालेल्या बैठकीत सम्मत झालेला ठराव

**(१.१)** एखादा अन्याय दूर करवून घेण्यासाठी समस्या ग्रस्त व्यक्तीने किंवा व्यक्तीसमुहाने सुरु केलेल्या न्यायालयीन संघर्षामध्ये सर्वोच्च न्यायालयापर्यंत जावून न्याय मिळवून घेण्यासाठी १०-१५ वर्षाचा वेळ निघून गेला अशी शेकडो उदाहरणे आपल्याला मिळून येतील. पण सर्वोच्च न्यायालयाने अतिशय निःसंदिग्ध शब्दांमध्ये (१) "१९९१ चे नेट-सेट बाबतचे रेग्युलेशन हे शिफारशीच्या स्वरुपाचे होते. **त्या शिफारसी राज्य शासनाने किंवा विद्यापीठाने सक्तीच्या केल्यास पुढील काळात सेवेत येणाऱ्या अर्जदारांना लागू राहतील.**" असा १९९४ मध्ये दिलेला निर्णय व (२) "अर्ज करण्याची शेवटची तारीख निघून गेल्यावर त्या जाहिरातीमध्ये नमुद करण्यात आलेली पात्रता बदलविता येत नाही" हा सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने (Full Bench) १९९७ मध्ये दिलेला निर्णय या दोनही निर्णयांना या भूमिचा कायदा (Law of the Land) असे स्वरुप प्राप्त झालेले असतांना व १५ व १६ वर्षाचा काळ उलटून गेल्यावरही हे निर्णय महाराष्ट्रातील शिक्षकांना सुद्धा लागू होतात ही गोष्ट लक्षात घेण्यास महाराष्ट्राचे उच्च शिक्षण खाते सतत टाळाटाळ करित राहिले व त्यामुळे हे १० हजार अधिव्याख्याते अकारणच मानखंडना व उपहास सहन करीत आहेत. असे उदाहरण शोधूनसुद्धा सापडणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने ८ सप्टेबर, १९९४ रोजी देशभरासाठी दिलेला नेट-सेटच्या रेग्युलेशनबाबतचा हा तपशिलवार निर्णय अनेक विधानमंडळ सदस्यांनी खुद्द सभागृहात अनेकवेळा उच्च शिक्षण विभागाच्या लक्षात आणून दिला. खुद्द महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने गेल्या सोळा वर्षात अनेक वेळा ही गोष्ट उच्च शिक्षण विभागाच्या लक्षात आणून दिली. मात्र उच्च शिक्षण विभागाने सातत्याने सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाची अवहेलना केली व त्याचबरोबर १० हजारावर नियमितपणे सेवेत आलेल्या या शिक्षकांची सतत कुचंबणा सुरु ठेवण्याचे धोरण स्विकारले.

**(१.२)** सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाबाबत महाराष्ट्र शासनाची भूमिका जाणून घेण्यासाठी काही विधानमंडळ सदस्यांनी विचारलेला "नेटसेट परीक्षेच्या स्वरुपाविषयी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला अंतिम निर्वाळा" या मथळ्याचा तारांकित प्रश्न क्रमांक १९५२१ हा ११ डिसेंबर २००१ च्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. "**नेटसेटची परीक्षा उमेदवारांसाठी सक्तीची करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनबाबत एका प्रकरणात (सिव्हील अपील नं.१८१९/१९९४ ए.आय.आर. सुप्रिम कोर्ट ३३६) सर्वोच्च न्यायालयाने या रेग्युलेशनची तपशीलवार चिकित्सा करणारा अंतिम निर्णय दिला व विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे रेग्युलेशन शिफारशीच्या (रेक्मेंडटरी) स्वरुपाचे असून त्या शिफारसी राज्य शासनाने किंवा विद्यापीठाने सक्तीच्या केल्यास पुढील काळात सेवेत येणाऱ्या अर्जदारांना लागू राहतील (प्रॉस्पेक्टीव्ह) असा स्पष्ट निवाडा सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे, हे खरे आहे काय?**" या प्रश्न भाग १ ला मा. उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील **यानी एका शब्दात "होय" असे ठाम उत्तर दिले होते.** *मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर २००१ रोजीच्या महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२६, क्रमांक ७, पृष्ठ ३९ वर आजही हे उत्तर कोणालाही पाहता येईल. (P 60 NB 4 of 2009)*

**(१.३)** कार्यवाहीचे हे अधिकृत प्रतिवेदन पाहिल्यास ठामपणे "होय." असे उत्तर एका शब्दात देवून पूर्ण विराम दिल्यानंतर लगोलग त्याच उत्तरात पुढे "विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेल्या खुलास्या अनुसार हे विनियम दिनांक १९ सप्टेंबर १९९१ पासून लागू असून हे अनिवार्य स्वरुपाचे असल्याने सर्व विद्यापीठांना त्यांचे पालन करणे बंधनकारक आहे." असे नमुद केले आहे. *(P 308 NB 13 of 2001)*

**(१.४)** तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री हे स्वतः कायद्याचे उत्तम जाणकार होते. सर्वोच्च न्यायालयाचा अंतीम निर्णय व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना या दोनपैकी कायद्याच्या दृष्टीने कशाचा आदर केला पाहिजे हे त्यांना कळत नव्हते असे नाही. या १० हजार लोकांवर आपण अन्याय करीत आहोत हे त्यांना मनोमन पटले होते. त्यामुळेच ते परस्पर विरोधी भाषा खुद्द सभागृहात वापरत होते.. *महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट २००१ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५ पृष्ठ १४१ वर (P 59 NB 4 of 2009) त्यांनी वापरलेली शब्दरचना शब्दशः पुढील प्रमाणे :-*

"**यु.जी.सी. असे म्हणते की नेट-सेट १९९१ पासून अनिवार्य आहे. सुप्रीम कोर्टाचे जजमेंट वेगळे म्हणते.** राज्य सरकारने वारंवार यु.जी.सी.च्या आधाराने आणि बाकीच्या गोष्टीच्या आधाराने सभागृहामध्ये तसेच सभागृहाच्या बाहेरही परीक्षा अनिवार्य आहे अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे या राज्यामध्ये १९९१ सालापासून ते १९९९ सालापर्यंतच्या मधल्या काळात जे शिक्षक निरनिराळ्या विद्यापीठात नोकरीस लागलेले आहेत, ज्यांनी नेट-सेटची अर्हता धारण केलेली नाही **अशा १० हजार शिक्षकांच्या भवितव्याचा हा प्रश्न आहे आणि या राज्यातील या दहा हजार शिक्षकांच्या भवितव्याचा प्रश्न सहानुभूतीने सोडविण्याच्या दृष्टीने राज्य सरकार निश्चितपणे विचार करीत आहे. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की या संदर्भातील निर्णय राज्य सरकार १५ दिवसामध्ये**

# आंदोलन विशेषांक

**घेईल.** "

**(१.५)** "नेट-सेटचे १९९१ चे रेग्युलेशन शिफारशींच्या स्वरुपाचे असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे काय?" या प्रश्नाला 'होय' असे उत्तर मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी दिले. "हे रेग्युलेशन ज्यावेळी विद्यापीठ किंवा राज्य शासन सक्तीचे करील तेव्हा ते पुढे सेवेत येणाऱ्या अर्जदारांना लागू राहील असाहि निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे हे खरे आहे काय?" या प्रश्नाला सुध्दा "होय" असेच उत्तर दिल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने काय सूचना दिल्या आहेत याचे जे कौतुक महाराष्ट्रात त्यानंतरच्या १०-१५ वर्षात करण्यात आले होते किंवा येत होते ते खरे म्हणजे कौतुकास्पदच होय.

**(१.६)** सन १९९१ ते १९९९ या काळात नेट-सेट पात्रता महाराष्ट्रात शासनाने कायद्यानुसार लागू केली नाही, **ही चुक झाली ही गोष्ट खुद्द मा. उच्च शिक्षणमंत्री यांनी मान्य केली.** ही चूक झाली असेल तर आम्ही दुरुस्त करु असे मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक १७ मार्च १९९४ रोजी सभागृहात सांगितले होते. तिथून सात वर्षानी दिनांक ३ ऑगस्ट, २००१ रोजी ही चूक झालेली आहे ही गोष्ट मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी पुढील शब्दात मान्य केली :- "सभापती महोदय, ही बाब खरी आहे की, १९९१ साली यु.जी.सी.ने रेग्युलेशन्स राज्य सरकारला पाठविले होते. त्यानंतर राज्यसरकारने हे रेग्युलेशन्स विद्यापीठांना पाठवत असतांना ते **असाधारण राजपत्रात** प्रसिध्द करुन पाठवावयास पाहिजे होते. तसे करण्यात आले असते तर ते लीगल इन्स्ट्रुमेन्ट ठरले असते. **परंतु राज्य सरकारकडून त्या वेळी ही चूक झालेली आहे.** १९९१ मध्ये जी.आर.काढून राज्य सरकारने विद्यापीठांना हे आदेश पाठविले होते. राज्य सरकारचा हा जी.आर.जरी असला तरी लीगल इन्स्ट्रुमेन्ट नसल्यामुळे विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नसतील." विधीवतरित्या नेटसेटची पात्रता १९९९ पर्यंत महाराष्ट्रात लागूच करण्यात आली नव्हती, एवढेच सांगून मा. उच्च शिक्षण मंत्री थांबले नाहीत तर ती केंव्हा पासून लागू करण्यात आली, हे सुद्धा त्यांनी त्याच दिवशी सभागृहात सांगितले. *महाराष्ट्र विधानपरिषद - कार्यवाही - शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट, २००१ - कार्यवाहीचे अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक १५ पृष्ठ १४१ वर* (P 91 NB 6 of 2009) *त्यांनी वापरलेली शब्दरचना शब्दशः पुढील प्रमाणे :-*

"ज्यावेळी पाचवा वेतन आयोग लागू करण्याची वेळ आली त्यावेळी **दिनांक ११-१२-१९९९ रोजी मी शिक्षण मंत्री होतो त्यावेळी या संदर्भात विहित पध्दतीने विद्यापीठांना आदेश देण्यात आले होते.** एवढेच नव्हे तर विद्यापीठ कायद्यात सुध्दा त्या संदर्भात आपण काही दुरुस्ती केली होती. त्याचा परिणाम असा झाला की १९९१ साली राज्य सरकारने आदेश देऊनही विद्यापीठानी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले नव्हते. **आता १९९९ मध्ये राज्य सरकारने आदेश दिल्यानंतर सर्व विद्यापीठांनी आपल्या स्टॅट्युटसमध्ये बदल केलेले आहेत.**"

**(१.७)** "सभापती महोदय,... अधिव्याख्यात्यांना नेट सेट ची परीक्षा १९९१ ला कम्पलसरी करण्यात आली होती परंतु लीगल इन्स्ट्रुमेन्टच्या माध्यमातून किंवा **स्टॅट्युटमध्ये** किंवा व्हाईस चॅन्सेलरच्या **डायरेक्शन्समध्ये** किंवा गव्हर्नमेन्टच्या **कोड मध्ये** यासंबंधीचा उल्लेख न केल्यामुळे नेट सेटची परीक्षा कायद्याने लागू करता आली नाही" असे मा. विद्यमान उच्च शिक्षणमंत्र्यांनी सुद्धा दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी विधानपरिषद सभागृहात सांगितले.

**(१.८.१)** १९९९ पर्यंत महाराष्ट्रात "नेट-सेट पात्रतेची अट" ही विद्यापीठ अनुदान आयोगाची जी शिफारस आहे, ती **कायद्याने ज्यांना अधिकार दिलेले आहेत त्या कोणत्याही विधिमय अधिसत्तेने लागू केली नव्हती. लागू करणाराने लागू केल्यावर ती लागू होईल असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होता.** जाहिरातीची मुदत संपून गेल्यानंतर पात्रतेच्या अटीमध्ये नंतर बदल करता येत नाही. असा सर्वोच्च न्यायालयाच्या फुल बेंचचा निर्णय होता व आहे. उपरोक्त दोनही निर्णय आजतागायत कायम असल्याने Law of the land या स्वरुपाचे आहेत. असे असतांना सन १९९१ ते सन १९९९ या कालखंडात सेवेत आलेल्या १० हजार शिक्षकांची सन २००९ पर्यंत जी मानखंडना करण्यात आली त्याला तोड नाही. पुढे पुढे काही शासकिय अधिकाऱ्यांच्या याबाबतच्या वागणूकीला अमानवी कृत्याचे स्वरुप प्राप्त झाले. सेवेत आल्या आल्या अशा तरुण शिक्षकांचा वर्षानुवर्षे तेजोभंग करून आपण उच्च शिक्षण क्षेत्रावर केवढा मोठा अन्याय करीत आहोत याचे भानसुद्धा या कामाचे नेतृत्व करणाऱ्या शासनाधिकाऱ्यांना राहिले नाही.

**(१.८.२)** जे करायला पाहिजे होते ते केले नाही आणि समझोत्यामध्ये, कायद्यामध्ये, नियमामध्ये, यु.जी.सी.च्या किंवा केंद्रशासनाच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये, मान्य झालेल्या समग्र योजनेमध्ये, अंतर्भूत नसलेल्या अनेक गोष्टी करण्याचा एकामागून एक सपाटा आमच्या नोकरशाहीने महाराष्ट्रामध्ये जो सुरू केला तो थांबता थांबेना. या स्थितीचा गेले १५-२० वर्षे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ अनुभव घेत आहे. : (१) "नेट सेट परीक्षा उत्तीर्ण केली असेल तरच ३१ मार्च, १९९४ नंतर त्यांना सेवेत ठेवण्यात यावे" असा पहिला हूकुम २ फेब्रुवारी १९९४ च्या शासन पत्रान्वये काढण्यात आला.

(२) "३१ मार्च, १९९५ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा दुसरा आदेश ७ मार्च १९९४ च्या पत्रान्वये देण्यात आला.

(३) त्यानंतर "३१ मार्च १९९६ पर्यंत नेट सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवामुक्त करा" असा आदेश २० मार्च, १९९४ च्या शासन पत्रान्वये देण्यात आला.

(४) त्यांना वार्षिक वेतनवाढ देण्यात येवू नये.

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*Registered under the Trade Union Act 1926. No By II-8162 of 1985*
*Affiliated to the All India Federation of University and College Teacher's Organizations (AIFUCTO)*
**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai – 400 020**


**PRESIDENT**
Prof. Shivajirao Patil
SHIVAI 39 Rewu Nagar, Dheku Road,
Amalner 425 401, District Jalgaon (9422278418)

**GENERAL SECRETARY**
Dr. Tapati Mukhopadhyay
Park Side 3, Wing, Flat No. 1308 Kulupwadi
Road, Borivali (East) Mumbai 400 066


### 18 th JANUARY 2012

**(1) Shree Prithvirajaji Chavan**
Hon'ble Chief Minister, Maharashtra State, Mantralaya, Mumbai

**(2) Shree Rajeshji Tope**
Hon'ble Minister for Higher & Technical Education, Maharashtra State, Mantralaya, Mumbai

**Hon'ble Sir,**

We hereby, enclose the **Movement Resolution** Passed in the MFUCTO Meeting held in Jalgaon on Sunday 15th January 2012, alongwith an **Action Programme** to be launched soon in the State of Maharashtra. We request you to go through the Resolution and take necessary action to resolve the burning problems faced by the College and University teachers in the State of Maharashtra. With regards,

Yours,

**Prof. Shivajirao Patil,** President **Dr. Tapati Mukhopadhyay,** General Secretary

Copy to - Hon'ble Vice Chancellors of all Non Agricultural Universities, Maharashtra State. **FS : P 01 **

(५) त्यांना तदर्थ नेमणूका देण्यात याव्या.

(६) त्यांची सेवा सेवाज्येष्ठतेसाठी धरु नये. अशा अनेक वेठबिहारीच्या स्वरुपाच्या व बेकायदेशीर अटी त्यानंतर लादल्या गेल्या. **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने यातील उथळपणा लक्षात आणून दिल्यावर पुढे हे सारे आदेश नोकरशाहीला मागे घ्यावे लागले, हा भाग वेगळा.**

**(१.८.३)** एवढ्यावरच हा प्रकार थांबला नाही. तर त्यानंतर सुद्धा अनेक "शक्तीचे प्रयोग" सादर करण्यात आले.

(१) दि. १९.९.१९९१ ते दि. ११.१२.१९९९ या कालावधीत नियुक्त्या झालेल्या सर्व (बिगर नेट/सेट) अधिव्याख्यात्यांनी डिसेंबर, २००३ पर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. असा हुकुम काढण्यात आला.

(२) हे बिगर नेट/सेट अधिव्याख्याते ज्या तारखेला नेट/सेट परीक्षा पास करतील, त्या तारखेपासून त्यांची सेवा वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणीच्या लाभासाठी ग्राह्य धरली जाईल. तसेच जे अधिव्याख्याते नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांचे नाव ज्येष्ठता सूचीत नियमानुसार समाविष्ट केले जाईल. असाही आदेश काढण्यात आला.

(३) सन २००९ च्या ४४ दिवसाच्या आंदोलनाच्या काळात हे सारे लोक बेकायदेशीररित्या नेमल्या गेलेले आहेत त्यांना सेवेतून काढून टाकण्यासाठी विधी विभागाचा सल्ला घेण्यात आला. तेव्हा विधी विभागाने "Not desirable" असा सल्ला दिल्यामुळे या शासकिय अधिकाऱ्यांच्या त्या महमद तघलकी कृत्याचे दर्शन महाराष्ट्राला घडले नाही.

(४) यांना नोकरितून काढता आले नाही यामुळे दात खट्टू झालेल्या उच्च शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी "यांना सहाव्या वेतन आयोगातील कोणतीही वेतनश्रेणी द्यायची नाही. पाचव्या वेतन आयोगाच्या आहे त्या वेतनश्रेणीत तडफडत राहू द्या" अशी दुर्दैवी भूमिका घेतली व तसा शासन निर्णय सुद्धा निर्गमित करण्यात आला. "चौथ्या वेतन आयोगात त्यांना सुरुवातीची वेतनश्रेणी देण्यात आली होती, तशी ती पाचव्या वेतन आयोगातहि देण्यात आली होती. त्यामुळे आता सहाव्या वेतन आयोगातसुद्धा ती सुरुवातीची वेतनश्रेणी त्यांना दिली जाईल" अशी ठाम भूमिका तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण व उच्च शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांनी घेतल्यामुळे अधिकाऱ्यांचे ते कारस्थान मोडीत निघाले. मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी स्वतः पुढाकार घेऊन "या सर्वांना सहाव्या वेतन आयोगाची सुरुवातीची वेतनश्रेणी दिली जाईल" या तरतुदीचा मतैक्य पत्रात समावेश केला व त्याप्रमाणे दुरुस्ती करणारा शासननिर्णय १९ नोव्हेंबर, २००९ रोजी निर्गमित झाला.

**(१.९.१)** एखाद्या पदाची जाहिरात दिल्यानंतर त्या "जाहिरातीनुसार अर्ज करण्याची जी शेवटची तारीख असेल ती उलटून गेल्यानंतर पात्रतेच्या अटीमध्ये बदल करता येणार नाही" हे तत्व सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने (Full Bench) ठरवून दिले असून त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठांनी अनेक निर्णय दिले व देशातील उच्च न्यायालयांनी त्या तत्वानुसार डझनावारी प्रकरणे निकालात काढली. ही गोष्ट याबाबत लक्षात घेणे आवश्यक आहे.

**Once the due date of submission of application is over, no change in qualification is permitted as per Supreme court judgements.**

**(१.९.२)** In the case of ***Ashok Kumar Sharma and others...Versus...Chander Shekhar and another,*** reported in ***1997 (4) Supreme Court Cases 18*** the three Judge Bench considered the issue and held in paragraph No.6 thus:

**6. .....The proposition that where applications are called for prescribing a particular date as the last date for filing the applications, the eligibility of the candidates shall have to be judged with reference to that date and that date alone, is a well-established one.** A person who acquires the prescribed qualification subsequent to such prescribed date cannot be considered at all. An advertisement or notification issued/published calling for applications constitutes a representation to the public and the authority issuing it is bound by such representation. It cannot act contrary to it. One reason behind this proposition is that if it were known that persons who obtained the qualifications after the prescribed date but before the date of interview would be allowed to appear for the interview, other similarly placed persons could also have applied. Just because some of the persons had

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO) : Affiliated to the AIFUCTO**

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, B-Road, Churchgate, Mumbai 400 020.**

The meeting of the Executive Committee of MFUCTO held on 15th January, 2012 in Jalgaon, resolved to Hold

# A MASSIVE DHARNA

## AT AZAD MAIDAN, MUMBAI
## ON
## THURSDAY, 1st MARCH, 2012

**Prof. Shivajirao Patil**
(President)

**Dr. Tapati Mukhopadhyay**
(General Secretary)

applied notwithstanding that they had not acquired the prescribed qualifications by the prescribed date, they could not have been treated on a preferential basis. Their applications ought to have been rejected at the inception itself. This proposition is indisputable and in fact was not doubted or disputed in the majority judgment. This is also the proposition affirmed in *Rekha Chaturvedi v. University of Rajasthan*. ....

**(१.९.३)** In the case of ***Gopal Krushna Rath...Versus...M.A.A. Baig (Dead) By Lrs. and oth-***

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,*

*मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.*

***क्रमांक : संकीर्ण २०११/(५१२/११)-विशि-१ : दिनांक ३० नोव्हेंबर, २०११***

**प्रति,**

(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे. (२) श्री. शिवाजीराव पाटील (अध्यक्ष एमफुक्टो) शिवाई, ३९ रेउनगर ढेकू रोड, अमळनेर, जि. जळगांव (३) डॉ. तपाती मुखोपाध्याय (महासचिव एमफुक्टो) पार्क साइड, ३ विंग, फ्लॅट नं. १३०८, कुलूपवाडी रोड, बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६.

**विषय :** एमफुक्टोच्या विविध प्रश्नाबाबत चर्चा करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा. मंत्री (उ.व तं.शि.वि.) यांच्याकडे दिनांक १६ नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

आपला

**(विकास तु. कदम)**

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

*प्रत :- मा.मंत्री (उ. व तं.शि.वि.) यांचे खाजगी सचिव, प्रधान सचिव (उ.व तं.शि.वि.) यांचे स्विय सहायक, उपसचिव (वि.शि.) यांचे स्विय सहायक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.*

*****

### *उच्च व तंत्र शिक्षण विभाग/विशि-१*

***मा. मंत्री (उ.व तं.शी) यांचे एमफुक्टो संघटनेसोबत दिनांक १६.११.२०११ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त***

**सदर बैठकीस खालील अधिकारी / पदाधिकारी उपस्थित होते.**

(१) प्रधान सचिव, (उ.व तं.शि) (२) श्री. विक्रम काळे, विधानपरिषद सदस्य (३) उपसचिव, (वि.शी) (४) संचालक, उच्च शिक्षण (५) श्री. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष, एमफुक्टो, (६) श्रीमती तपाती मुखोपाध्याय, महासचिव, एमफुक्टो, (७) एमफुक्टो व बामफुक्टो संघटनेचे पदाधिकारी,

**२. सदर बैठकीमध्ये एमफुक्टोच्या पदाधिकाऱ्यांनी पुढील मुद्दे मांडले :-**

(i) दिनांक १९ सप्टेंबर १९९९ ते ३ एप्रिल २००० या कालावधीत बिगर नेट/सेट अध्यापकांच्या अनुषंगाने **विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १६ ऑगस्ट रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सदर कालावधीत बिगर नेट-सेट अध्यापकांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून CAS लागू करण्याबाबतची कार्यवाही राज्यशासनाने त्वरीत करावी.**

(ii)माहे एप्रिल, २००९ ते जानेवारी, २०१० या कालावधीतील थकीत रक्कम तात्काळ देण्यात यावी.

(iii)सहाव्या वेतन आयोगानुसार पीएच.डी. धारक अध्यापकांना लागू असलेले incentives त्वरीत देण्यात यावेत.

(iv)तासिका तत्वावरील अध्यापकास विहीत वेळेत वेतन देण्यात यावे

(v)शासनाच्या ३० सप्टेंबर २०१० च्या निर्णयान्वये नेट-सेट नसलेल्या (बिगर नेट-सेट) अध्यापकांच्या सेवा ३१ डिसेंबर २०११ रोजी यु.जी.सी.च्या मान्यतेप्रमाणे सेवा समाप्ती न करण्याचा शुद्धीपत्रक/खुलासा कळविणे.

**३ उक्त मुद्दा क्रमांक १ च्या अनुषंगाने विभागाने खालील बाबी स्पष्ट केल्या:-**

(a) विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १६ ऑगस्ट, २०११ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील अकृषि विद्यापीठांना दिनांक १९.९.१९९१ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीत बिगर **नेट-सेट अध्यापकांच्या नियमित नियुक्त्या केल्या आहेत व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार नेट/सेट मधून सुट देऊन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रकरणांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ६.७.२०११ च्या बैठकीत मान्यता मिळाल्याचे कळविले आहे.** ~~(i)~~

(b) तसेच दिनांक २६ ऑगस्ट, २०११ च्या पत्रान्वये दिनांक १९ सप्टेंबर, १९९१ ते ३ एप्रिल, २००० या कालावधीत नियमित नियुक्त्या झालेल्या **बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा त्यांच्या नेमणूकीच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यात याव्यात.** ~~(ii)~~

(c) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने दिलेले आदेश विचारात घेऊन यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्यातील ३१५८ बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना देण्यात आलेली **सूट रद्द केल्याचे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ३ जून २०१० रोजी निर्गमित केले आहेत.** ~~(iii)~~

(d) सदर सुट रद्द केलेल्या अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०११ च्या आदेशानुसार पुन्हा सुट दिल्याचे व त्याचप्रमाणे दिनांक २६ ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये त्यांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून CAS चे लाभ **देण्याचे ग्राह्य धरण्यात यावे किंवा कसे याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उक्त दोन्ही पत्रामध्ये स्पष्ट केलेले नाही,** त्यामुळे याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्पष्टीकरण प्राप्त करणे आवश्यक वाटते. ~~(iv)~~

(e) विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या दिनांक २७ ऑगस्ट, २००९ च्या पत्रान्वये राज्यातील बिगर नेट/सेट अध्यापकांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तिर्ण होणे अनिवार्य असल्याचे आदेश दिले. तथापि आता, उक्त दिनांक १६ ऑगस्ट, २०११ च्या पत्रान्वये सन १९९१ ते सन २००० पर्यंतच्या बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना सरसकट नेट/सेट मधुन सुट दिल्याचा निर्णय घेतला. **या आदेशामुळे उक्त दिनांक २७ ऑगस्ट, २००९ चे आदेश रद्द झाले किंवा कसे याबाबतही विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या दिनांक १६ व २६ ऑगस्ट २०११ च्या पत्रात स्पष्ट केलेले नाही.** त्यामुळे या संदर्भातही विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्पष्टीकरण प्राप्त करणे आवश्यक वाटते. ~~(v)~~

(f) विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील बिगर नेट/सेट अध्यापकांना CAS चे लाभ त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून अनुज्ञेय करावयाचे झाल्यास राज्य शासनावर किती आर्थिक भार येईल, याबाबतची माहिती संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. ~~(vi)~~

४. एमफुक्टो संघटनेने व विभागाने मांडलेल्या वरील मुद्यांच्या अनुषंगाने **पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश मा. मंत्री महोदयांनी दिले.** :-

(i) उक्त परिच्छेद क्रमांक ३ मधील (iv)) व (v) बाबत प्रधान सचिव किंवा उपसचिव यांनी **विद्यापीठ अनुदान आयोगाकडे व्यक्तीशः संपर्क करुन आठ दिवसात स्पष्टीकरण प्राप्त करुन घ्यावे व** (vi) बाबत संचालक, उच्च शिक्षण यांनी आठ दिवसात आवश्यक ती माहिती शासनास सादर करावी. **उक्त माहिती प्राप्त होताच आवश्यक तो प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करावा.**

(ii)उक्त परिच्छेद क्रमांक २ मधील (ii) बाबत पुरवणी मागणीद्वारे आवश्यक ती रक्कम येत्या अधिवेशनात अर्थसंकल्पित करून सदर थकीत रक्कम अदा करावी. (iii) बाबत संचालकांनी त्यांच्या स्तरावर विभागीय सहसंचालकांची बैठक तात्काळ घेऊन आवश्यक ते निर्देश द्यावेत (iv) तासिका तत्त्वावरील अध्यापकांना जास्तीत जास्त एक महिन्याचा कालावधी विलंब वगळता वेळेवर प्रत्येक महिन्यास वेतनाची रक्कम अदा करावी. यामध्ये एक महिन्यापेक्षा अधिक विलंब झाल्यास संबंधित सहसंचालकास जबाबदार धरून त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

५. शेवटी सर्वांचे आभार मानून बैठक संपली.

**AF : P 01 **

***ers,*** reported in ***1999 (1) Supreme Court Cases 544*** the Hon ble Supreme Court in paragraph Nos.6 and 7 held thus:

6. When the selection process has actually commenced and the last date for inviting applications is over, any subsequent change in the requirements regarding qualifications by the University Grants Commission will not affect the process of selection which has already commenced. Otherwise it would involve issuing a fresh advertisement with the new qualifications. In the

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*Registered under the Trade Union Act 1926. No By II-8162 of 1985*

*Affiliated to the All India Federation of University and College Teacher's Organizations (AIFUCTO)*

**Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai – 400 020**

**PRESIDENT**
Prof. Shivajirao Patil
SHIVAI 39 Rewu Nagar, Dheku Road,
Amalner 425 401, District Jalgaon (9422278418)

**GENERAL SECRETARY**
Dr. Tapati Mukhopadhyay
Park Side 3, Wing, Flat No. 1308 Kulupwadi
Road, Borivali (East) Mumbai 400 066

## 30 th NOVEMBER 2011

**Shri Rajesh Tope**
Hon'ble Minister for Higher & Technical Education ,
Maharashtra State, Mantralaya, Mumbai 400 032

**Subject:** Meeting held by you with MFUCTO on 16th November 2011 Minutes of the meeting circulated by your office

Hon'ble Minister, Sir:

**(1)** I write this letter to thank you for having given an appointment to the MFUCTO delegation to meet you to discuss some of the long pending issues concerning teachers. The minutes of the said meeting has been sent to me as the General Secretary of the MFUCTO on 30th November 2011. At the outset it is necessary to point out that the Minutes do not reflect correctly discussion that had taken place. Therefore it has become necessary to bring the following points from our side to put the record straight and to ensure that the matter is not unnecessarily bogged down through administrative action of obtaining unwarranted clarifications:

**A.** Under para 2 five points are taken for discussion of which, there are serious anomalies with respect **to point five as explained below**

**B.** Under para.2 in respect of Sr. No. (v) MFUCTO made a reference to the GR dated 30-9-2010 and pointed out that the GR was based on a wrong understanding that the non-NET/SET teachers appointed between 19-9-1991 and 11-12-1999 (3-4-2000) in Maharashtra are covered by NET/SET qualification condition. The said assumption was not correct as the said teachers were not at all covered by the said qualification condition. **The delegates of the MFUCTO therefore requested that the Government should immediately withdraw the GR which had put the time limit of 31-12-2011 for clearing NET/SET by these teachers.** It was also pointed out on behalf of the MFUCTO that some of the managements such as the the Rayat Shikshan Sanstha had issued notices to hundreds of teachers in their colleges that they will be terminated from service if they did not clear NET/SET by 31-12-2011.

In connection with this, the Hon'ble Minister appreciated the issue correctly and sympathetically and called upon the Deputy Secretary (Shri R.G. Jadhav) to immediately write to the Rayat Shikshan Sanstha intimating them that the GR was no more valid in view of the developments that had taken place through the UGC on NET/SET. MFUCTO demanded to withdraw the said G.R and to issue a fresh corrigendum in this regard.

**In this regard the assurance given by the Minister has been omitted from the Minutes though a reference to GR dated 30-9-2010 is made.**

**C.** Under para.3, points covered in Sr. Nos. (a) & (b) represent the factual position. However, the Sr. Nos. (c) & (d) do not reflect correctly the discussions which have taken place in the meeting.

**D.** Under para.3 in respect of Sr. Nos. (c) & (d), the **Hon'ble Minister stated that he had in fact met Shri Kapil Sibal, Hon'ble Union HRD Minister who pointed out that the long pending problem of non-NET/SET teachers in Maharashtra appointed between 19-19-1991 and 3-4-2000 has been resolved by the MHRD and UGC and the State Government has to implement the same.** Shri R.G. Jadhav, Deputy Secretary and Shri Vikas Kadam, Section Officer stated that in respect of the UGC letter with direction to the State Government on non-NET/SET teachers, obtaining clarification from the UGC would be necessary. **The Principal Secretary, Shri Sanjay Kumar endorsed the view expressed by the Hon'ble Minister and stated that he had seen the Order two months before and that the letter being self-explanatory no further clarification was necessary in the matter.** In view of the insistence of the said two officials for obtaining clarifications, the Hon'ble Minister stated that if at all any clarification was necessary **it should be obtained within 8 days time.**

**E.** Under para.3 in respect of Sr. Nos. (e), a reference is made to the UGC letter dated 27-8-2009 which had stated that teachers without the NET/SET should clear the said test by 31-12-2011. In the light of this it is also stated in the minutes the present UGC letters dated 16-8-2011 and 26-8-2011 have not clarified about the earlier UGC directions on acquiring NET/SET by 31-12-2011. **MFUCTO is shocked to read this as part of the Minutes when such discussion had not at all taken place.** This has been incorporated as part of the deliberations in the meeting which is unwarranted and brought in as an after-thought. In any case with the issuance of the letters dated 16th and 26th August 2011 **all the other earlier letters/orders issued by the UGC in respect of non-NET/SET teachers in Maharashtra appointed between 19-9-1991 and 3-4-2000 stand superseded. Seeking any clarification on the UGC letters dated 16th and 26th August 2011 therefore does not arise and UGC having treated the subject matter of non-NET/SET teachers in our State as a closed chapter, would be ridiculous more particularly because Shri Rajesh Tope, Hon'ble Minister had himself had talked to Shri Kapil Sibal, Hon'ble Union HRD Minister.**

**(2)** Para 4 of the minute recorded the instructions given by the Hon'ble Minister to the Deputy Secretary and other officers.

**(3)** MFUCTO is also shocked that there is a serious omission made in the Minutes about the **instruction given by the Hon'ble Minister for fixing the next meeting with the MFUCTO on 13th December 2011 at Nagpur during the winter session.** This was done after consulting the Personal Secretary on the engagements of the Minister. **By not making a reference to this, the holding of the next meeting with the Hon'ble Minister on 13-12-2011 is not possible.** The date of the next meeting to be decided in consultation with you after getting the corrected minutes .

**(4) MFUCTO therefore requests the Hon'ble Minister to direct the office to get the minutes duly corrected by taking into consideration the points brought out in this letter.** The present position has arisen only due to the omissions and commissions of the Deputy Secretary who was present in the to carry out this responsibility.

With respectful regards,

Yours faithfully

**(Tapati Mukhoapdhyay)** General Secretary — (M F U C T O) — **(Shivajirao Patil)** President

Copy forwarded with compliments to –**(1)** The Principal Secretary to Government of Maharashtra, Ministry of Higher & Technical Education, Mantralaya, Mumbai 400 032 **(2)** The Director of Higher Education, Maharashtra State, Central Building, Pune-411 001 **(3)** The Joint Director of Higher Education, Mumbai Region, Elphinstone Technical School Mahapalika Marg, Mumbai 400 001. for information

**FS : P 02 **

case of *P. Mahendran v. State of Karnataka* this Court has observed (SCC p. 416, para 5)

**5. It is well-settled rule of construction that every statute or statutory rule is prospective unless it is expressly or by necessary implication made to have retrospective effect. The Court further observed that :**

**Since the amending Rules were not retrospective, it could not adversely affect the right of those candidates who were qualified for selection and appointment on the date they applied for the post,** moreover as the process of selection had already commenced when the amending Rules came into force, the amended Rules could not affect the existing rights of those candidates who were being considered for selection as they possessed the requisite qualifications prescribed by the Rules before its amendment.

**7. In the present case, therefore, the appellant possessed the necessary qualifications as advertised on the last date of receiving applications.** These qualifications were in accordance with the Rules/guidelines then in force. There is also no doubt that the appellant obtained higher marks than the original Respondent 1 at the selection. There is no challenge to the process of selection, nor is there any allegation of malafides in the process of selection. In the case of ***Madan Mohan Sharma and another...Versus...State of Rajasthan and others,*** repor ted in ***2008 (3) Supreme Court Cases 724*** the Hon ble Supreme Court in paragraph Nos.11 and 12 held thus:

11. ......Once the advertisement had been issued on the basis of the circular obtaining at that particular time, the effect would be that the selection process should continue on the basis of the criteria which were laid down and it cannot be on the basis of the criteria which has been made subsequently.

12. As per the circular which was obtaining at the time when the advertisement was issued dated 24-7-1995, the criteria for selection to the post of teacher Grade III was Secondary Examination though this was changed during the pendency of the advertisement. Subsequent amendment of the Rules which was prospective cannot be made retrospective so as to make the selection on the basis of the Rules which were subsequently amended. If this was to be done, then the only course open was to recall Advertisement N o.1 of 1996 and to issue fresh adver tisement according to the Rules which had come into force. ...... (P 76 of NB 2010)

**(१.९.४)** Once the due date of submission of application is over, no change in qualification is permitted High court judgements. - High Court in Petition No. 1489 of 2010 gave a following verdict :-

10. **From the above, it is clear that the subsequent insertion of compulsory NET/SLET qualification by gazette notification dated 11.7.2009 made by University Grants Commission will have to be held to be prospective in its operation** since in all these cases the advertisements as per earlier eligibility qualifications were duly approved and sanctioned by the University and were also published well before the cut-off date, namely, 11.7.2009 and at any rate before the last date of application that was to be made pursuant to these advertisements. **Last date of application as per advertisements is a crucial date in accordance with the law laid down by the Hon'ble Supreme Court.**

11. For all the above reasons, therefore, we answer the question framed by us holding that the selections and **appointments made pursuant to the advertisements published in these writ petitions prior to 11.07.2009 shall not be affected by introduction of compulsory NET/SLET eligibility criteria** as the said gazette notification dated 11.07.2009 is prospective in nature. In the result, we make the following order. (P 73 of NB 2010)

**(१.९.५)** सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांनी कायद्याची जी दृढ स्थिती (Setteled Position of Law) भारतात स्थापित झालेली आहे

**महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १५ जानेवारी २०१२ रोजी जळगाव येथे झालेल्या बैठकीत सम्मत झालेला आंदोलनाचा ठराव**

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १५ जानेवारी २०१२ रोजी जळगाव येथे झालेल्या बैठकीत सम्मत झालेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार नागपूर व अमरावती येथील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मेळाव्याचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्या प्रमाणे आहे. सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. अनिल ढगे, सचिव, नुटा**

**तक्ता**

## नागपूर व अमरावती येथे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मेळाव्यांचे आयोजन

| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. | श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, कॉंग्रेस नगर, नागपूर | रविवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१२ | दुपारी ३.०० वाजता |
| संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. | केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती | शनिवार, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१२ | दुपारी ४.०० वाजता |

त्यानुसार **"एखाद्या पदासाठी भरती करतांना त्या पदासाठीची जी पात्रता जाहिरातीमध्ये नमुद केली असेल त्या पात्रतेमध्ये, एकदा त्या जाहिरातीनुसार अर्ज करण्याची मुदत संपून गेल्यावर, बदल करता येत नाही"** मा. सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत एकामागून एक अनेक निर्णय दिलेले आहेत :-

**(१.१०)** मा. सर्वोच्च न्यायालयाचा पुढील निर्णय याबाबतीत अत्यंत महत्वाचा असून या देशातील स्थिरप्रद कायदा म्हणून त्याचे सर्वत्र पालन केले जाते. "Once exemption from NET/SET is granted the appointment be treated as regularised." (Para 24 of the judgement delivered on 08.09.1994, in University of Delhi, Appellant v/s Raj Singh and others, Respondents. A.M. AHMADI AND S.P. BHARUCHA, JJ. : AIR 1995 SUPREME COURT 336.) *(P 316 of NB 2001)*

**(१.११)** सर्वोच्च न्यायालयाच्या या अनेक निर्णयामुळेच विद्यापीठ अनुदान आयोगाने आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी सेवा केंव्हापासून धरावी याबाबत गेल्या अनेक वर्षापासून ठाम भूमिका घेतली आहे. विधीसल्लागारांच्या सल्ल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २५ डिसेंबर १९९८ रोजी एक परिपत्रक काढले होते. (UGC by letter D.O. No.F.2-6/98 (PS) dated 25th December 1998) त्यात पुढील प्रमाणे तरतुद आहे. :-

"The commission after seeking legal opinion on clause 1 (e) has decided to include service rendered in adhoc capacity for counting of past service for placement in senior scale/selection grade, provided that three conditions, as mentioned hereunder are fulfiled.

(a) The adhoc service was of more than one year duration;

(b) The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee; and

(c) The incumbent was Selected to the permanent post in continuation to the adhoc service without any break."

**(१.१२)** आता जुन २०१० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनमध्ये (Notified under No.F.3-1/2009 dated 30th June 2010) सुद्धा अशीच तरतुद आहे. ती पुढील शब्दात :-

**"10.0 COUNTING OF PAST SERVICES FOR DIRECT RECRUITMENT AND PROMOTION UNDER CAS:**

**"10.1 (f) The adhoc or temporary service of more than 1 year duration can be counted provided that**

**(i) The period of service was of more than one year duration**

**(ii) The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee and**

**(iii) The incumbent was selected to the permanent**

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १५ जानेवारी २०१२ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेला आंदोलनाचा ठराव

# जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक १५ जानेवारी २०१२ रोजी झालेल्या बैठकीत सम्मत झालेल्या आंदोलनाच्या ठरावानुसार स्तंभ २ मध्ये दर्शविलेल्या जिल्ह्यातील शिक्षकांचा मेळावा स्तंभ तीनमध्ये दर्शविलेल्या दिवशी व दिनांकाला, स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या वेळी व स्तंभ ५ मध्ये दर्शविलेल्या स्थळी होईल. या सर्व जिल्हा मेळाव्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील. खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जिल्हास्तरीय मेळाव्यांचे आयोजन केलेले आहे. सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. अनिल ढगे, सचिव, नुटा**

**तक्ता**

| अ.नं. व जिल्ह्याचे नांव | मेळाव्याचा दिवस व दिनांक | मेळाव्याची वेळ | मेळाव्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ २ | ३ | ४ | ५ |
| १. यवतमाळ | रविवार, २९.०१.२०१२ | दुपारी ३.०० वा. | बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ. |
| २. वाशिम | शनिवार, ०४.०२.२०१२ | दुपारी ४.०० वा. | स्वामी विवेकानंद महाविद्यालय, रिसोड रोड, वाशिम |
| ३. अकोला | रविवार, ०५.०२.२०१२ | सकाळी १०.०० वा. | आर.एल.टी.सायन्स कॉलेज, अकोला. |
| ४. बुलढाणा | रविवार, ०५.०२.२०१२ | दुपारी ४.०० वा. | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा |
| ५. वर्धा | शनिवार, ०४.०२.२०१२ | दुपारी ४.०० वा. | यशवंत महाविद्यालय, वर्धा. |
| ६. भंडारा | रविवार, ०५.०२.२०१२ | सकाळी १०.३० वा. | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा |
| ७. गोंदिया | रविवार, ०५.०२.२०१२ | सकाळी ३.३० वा. | डी.बी.सायन्स कॉलेज गोंदिया |
| ८. चंद्रपूर व गडचिरोली | शनिवार, १९.०२.२०१२ | सकाळी ११.०० वा. | जनता महाविद्यालय, चंद्रपूर. |

**post in continuation to the adhoc or temporary service without any break "**

मा. सर्वोच्च न्यायालयाने " Sharadendu Bhushan, Appellant v. Nagpur University, Nagpur & Ors, Respondents " (AIR 1988, Supreme Court 335) *(2011 NBP81)* या प्रकरणात **experience is the basis of placement. "** असा जो निर्णय दिला होता त्यावर आधारित उपरोक्त व्यवस्था आहे.

**(१.१३)** केंद्र शासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाला ३ नोव्हेंबर २०१० रोजी एक पत्र पाठवून पुढील प्रमाणे भूमिका कळविली.:-

"The above mentioned resolution perhaps does not take into account the fact that appointments, If any, pursuant to the date of coming into force of **these regulations are bound to be prospective only. Appointments can never be made with retrospective dates.**

**Similarly, since by Commissions own admission, the regulations are prospective in nature and not retrospective."** *(2011NBP6)"*

**(१.१४) एका बाजूला** सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत एका मागून एक दिलेले अनेक निर्णय, **दुसऱ्या बाजूला** खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाचे "सेवा नेमणूकीच्या दिवसापासूनच धरण्यात येईल" असे अनेक वर्षापासून अस्तित्वात असलेले नियम, **तिसऱ्या बाजूला** खुद्द केंद्र शासनाने दिनांक ३ नोव्हेंबर २०१० च्या पत्रान्वये स्पष्टपणे दिलेले आदेश, यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने ८ जुलै, २०११ रोजीच्या आयोगाच्या बैठकीत फक्त एकट्या महाराष्ट्रासाठी जो निर्णय घेतला त्या निर्णयात असे म्हटले आहे की :-

"The Commission **deliberated** on the issue regarding appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19,1991 until April 3,2000 and resolved that all such **appointments made on regular basis** by various universities in the state of Maharashtra where the **university has granted exemption** to teachers from the requirement of NET in terms of the UGC Regulations, 1991 and subsequent Notification dated 24.12.1998 and where the **representation** has been forwarded to Commission seeking further approval in relation to such regular appointments made during the said period w.e.f. September 19,1991 till April 3, 2000 **is approved.** It further resolved that a communication in this regard be sent to the universities concerned and the state of Maharashtra" *(2011NBP86)* हा निर्णय महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण खात्याच्या मा. प्रधान सचिवांना १६ ऑगस्ट, २०११ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र पाठवून कळविला. त्याची प्रत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला सुद्धा देण्यात आली होती.

**(१.१५)** खरे म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोगाचा उपरोक्त निर्णय अतिशय स्पष्ट आहे. त्यात कुठेही संदिग्धता नाही.

(१) १९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० या काळात **महाराष्ट्रामध्ये नियमितरित्या नेमण्यात आलेल्या प्रत्येक मान्यताप्राप्त अधिव्याख्यात्याच्या नेमणूकीच्या बाबतीत हा निर्णय आहे.**

(२) हा प्रत्येक अधिव्याख्याता **नेट-सेट ही पात्रता धारण करणारा नसावा** व विद्यापीठाने त्याच्या नेमणूकीला मान्यता दिलेली असावी.

(३) अशा प्रत्येक प्रकरणी **विद्यापीठाने** नेट-सेट मधून एक्झम्शन देण्याबाबतची **विनंती आयोगाला केलेली असली पाहिजे.**

(४) **महाराष्ट्रातील विद्यापीठांनी केलेली अशी प्रत्येक विनंती विद्यापीठ अनुदान आयोगाने या निर्णयान्वये मान्य केलेली आहे.**

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

## *CIVIL APPELLATE JURISDICTION : WRIT PETITION NO.1893 OF 2010*

Pramod D.Sonawane ...Petitioner ***v/s.*** State of Maharashtra & ors. ...Respondents ***WITH*** **WRIT PETITION NO.1894 OF 2010** (Aher Ranganath Kisan ...Petitioner ***v/s.*** State of Maharashtra & ors. ...Respondents) ***WITH*** **WRIT PETITION NO.1900 OF 2010** (Gugale Gulab Sheshmal ...Petitioner ***v/s.*** State of Maharashtra & ors. ...Respondents) ***WITH*** **WRIT PETITION NO.1901 OF 2010** (Pokale Sunil N. ...Petitioner ***v/s.*** State of Maharashtra & ors. ...Respondents) ***WITH*** **WRIT PETITION NO.1902 OF 2010** (Sopan M. Rathod ...Petitioner ***v/s.*** State of Maharashtra & ors. ...Respondents) ***WITH*** **WRIT PETITION NO.2083 OF 2010** (Dr.Mane Shakuntala N. ...Petitioner ***v/s.*** State of Maharashtra & ors. ...Respondents) ***WITH*** **WRIT PETITION NO.2312 OF 2010** (Mahajan Dnyaneshwar M. ...Petitioner ***v/s.*** State of Maharashtra & ors. ...Respondents) ***WITH*** **WRIT PETITION NO.2314 OF 2010** (Dr.Gadave Kisan Mahadeo ...Petitioner ***v/s.*** State of Maharashtra & ors. ...Respondents) Mr.C.R.Sadashivan for the Petitioners. Mr.A.I.H.Patel, AGP for State. Mrs.Kalyani Pathak for Respondents Nos. 3 & 4.

**CORAM: D.K.DESHMUKH & N.D.DESHPANDE,JJ**
**DATED: 3RD SEPTEMBER, 2010**

**P.C.:**

1. Rule. Returnable forthwith. Heard finally by consent of parties.

2. Admitted position is that the Petitioner in these petitions are working as Lecturers in different Colleges affiliated to Pune University. **It is also common ground that their pay was fixed in the senior scale and the selection grade earlier. They were also paid in the senior scale and the selection grade as per the Government Resolution dated 11th December, 1999.** It is also an admitted position that now by the orders which are impugned in these petitions, **the Joint Director, Higher Education has cancelled the order made by him earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade.** It is also an admitted position that this has been done without issuing any show cause notice to the Petitioners. **In our opinion, the orders made in favour of the Petitioners as a result of which there was enhancement in the pay package of the Petitioners, could not have been cancelled by the Joint Director without hearing and issuing show cause notice to them.** As it is an admitted position that the orders granting senior scale and selection grade have been cancelled without granting an opportunity of being heard to the Petitioner, in our opinion, those orders will have to be set aside.

3. In the result, therefore, all the petitions succeed and allowed. **The orders impugned in the petitions, whereby the orders made earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade have been cancelled, are set aside,** with liberty to the Respondent No.2 to make fresh order in accordance with law. All the contentions available to both sides are kept open. Rule made absolute. No order as to costs.

**(D.K.Deshmukh, J.)** **(N.D.Deshpande, J.)**

**(१.१६)** विद्यापीठ अनुदान आयोगाचा हा निर्णय अतिशय सोपा व सरळ असून तो वरील ४ वाक्यात नमूद केलेला आहे. विद्यापीठाने केलेली अशी प्रत्येक विनंती आयोगाने मान्य केली आहे. याचा अर्थ त्या प्रत्येक अधिव्याख्यात्याची सेवा नेमणूकीच्या दिनांकापासूनच धरावी असा होतो व यापेक्षा वेगळा होत नाही पण त्याउपर सुद्धा महाराष्ट्र शासनातील काही अधिकाऱ्यांनी "कोणत्या तारखेपासून त्याची सेवा धरावी ते विद्यापीठ अनुदान आयोगाने आम्हाला कळविले पाहिजे." असा लाडिक हट्ट धरला. तेंव्हा विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्ट शब्दात दिनांक २६ ऑगस्ट, २०११ रोजी पत्र पाठवून "As may be seen from the above decision of the commission, the commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 19, 1991 to April 3, 2000. Therefore the services of such teachers **for all purposes should be counted from the date of their regular appointment.** " असे कळविले. *(2011NBP87)*

**(१.१७) "विद्यापीठ अनुदान आयोगाने केंव्हा पासून सेवा धरावी याबाबतची तारीख कळविल्यानंतर आम्ही एक महिन्यात निर्णय घेवू."** असे महाराष्ट्र शासनाने वारंवार महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला आश्वासित केले होते. विद्यापीठ अनुदान आयोगाने स्पष्ट शब्दात नेमणूकीच्या दिनांकापासून त्याची सेवा धरावी असे २६ ऑगस्ट २०११ च्या पत्राने कळविल्यानंतर आता जवळजवळ पाच महिन्याचा काळ उलटून गेला तरी महाराष्ट्र शासनाच्या पातळीवर कोणताही निर्णय झालेला नाही. यामुळे सबंध महाराष्ट्रभर उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये तिव्र असंतोष निर्माण झाला आहे.

**(१.१८)** महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला दिनांक २४ जुलै २००९ रोजी एक पत्र (क्रमांकएनजीसी २००८/२४३/२००८/विशि-१ ) पाठवून स्पष्टपणे "**(i) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी विनंती करील.** (ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसाच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल." असे कळविले होते. *(2009 NBP142)*

**(१.१९)** त्यानंतर पुन्हा महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण खात्याने दिनांक ३१ जुलै २००९ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला एक पत्र (क्र. एनजीसी (२००८/२४३/०८)/विशि-१) पाठवून पुढील प्रमाणे कळविले होते. :- "(i) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD

## WRIT PETITION NO. 1991 OF 2011

Sheshrao Vyankatrao Shete & another PETITIONERS ***VERSUS*** The State of Maharashtra and others RESPONDENTS Mr. V.D. Salunke, advocate for the petitioners. Mrs.A.V. Gondhalekar,A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2074 OF 2011** (Tulshiram Gyaniram Siral.. PETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS) Mr. V.D. Salunke, advocate for the petitioner. Mrs. A.V. Gondhalekar, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2075 OF 2011** (Rajkumar Namdevrao Ingle PETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS Mr. V.D. Salunke, advocate for the petitioner. Mrs. A.V. Gondhalekar, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2076 OF 2011** (Mahesh Bapurao SwamiPETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra and others RESPONDENTS.... Mr. V.D. Salunke, advocate for the petitioner. Mrs. A.V. Gondhalekar, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2077 OF 2011** (Ashok Santukrao KulkarniPETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS) Mr. V.D. Salunke, advocate for the petitioner. Mrs. A.V. Gondhalekar, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2078 OF 2011** (Venkat Sheshrao MaskePETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS) Mr. V.D. Salunke, advocate for the petitioner. Mrs. A.V. Gondhalekar, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2082 OF 2011(3)** (Dr. Satish Vasantrao YadavPETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS) Mr. V.L. Dhoble, advocate for the petitioner. Mrs. A.V. Gondhalekar, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2087 OF 2011** (Dr. Kantrao Pralhadrao PolePETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS) Mr. V.L. Dhoble, advocate for the petitioner. Mrs. A.V. Gondhalekar, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2091 OF 2011** (Dr. Dilipkumar Ganpatrao ShelgePETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS) Mr. V.L. Dhoble, advocate for the petitioner. Mrs. A.V. Gondhalekar, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO.2408 OF 2011** (Dr. Sanjay Namdevrao GadpayalePETITIONER) ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS) Mr. V.L. Dhoble, advocate for the petitioner. Mrs. A.V. Gondhalekar, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2072 OF 2011** (Prashant Girijashankar GawaliPETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS) Mr. V.D. Salunke, advocate for the petitioner. Mr. S.K. Kadam, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2073 OF 2011** (Suresh Dagdu DhimdhimePETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS) Mr. V.D. Salunke, advocate for the petitioner. Mr. V.D. Godbharle, A.G.P. for the respondent/State. ***WITH*** **WRIT PETITION NO. 2079 OF 2011** (Vilas Tulshiram NarwadePETITIONER ***VERSUS*** The State of Maharashtra & others RESPONDENTS) Mr. V.D. Salunke, advocate for the petitioner. Mr. B.V. Wagh, A.G.P. for the respondent/State.

**CORAM : D.B. BHOSALE & M.T. JOSHI, JJ.**

**DATED : 28th MARCH, 2011**

**PER COURT :**

1.Rule. Rule made returnable forthwith. Heard finally by consent of learned counsel for the parties.

2.Admittedly, the petitioners in the present petitions are appointed as Lecturers in different colleges in this region. Admittedly, their pay was fixed in the senior scale and the selection grade earlier as per the applicable Government Resolution dated 11th December, 1999. Admittedly, **the Joint Director of Higher Education, Pune Region has cancelled the order of earlier pay fixation. It is admitted fact that this exercise was carried without issuing any show cause notices to the petitioners.** Thus, the petitioners are adversely affected by the order without granting an opportunity of being heard. In our opinion, therefore, those orders will have to be set aside. Further, some of the Lecturers working within the jurisdiction of Pune University with the similar grievances have succeeded on this ground, **vide order dated 3rd September, 2010 passed in writ petition No. 1893/2010 and five other writ petitions,** a copy of which is placed before us by learned counsel for the petitioners.

3.In the result, all the petitions succeed and are allowed. **The impugned orders are set aside with liberty to the Joint Director of Higher Education to make fresh order in accordance with law.** All the contentions to both the sides are kept open. Rule made absolute. No order as to costs.

**[M.T. JOSHI, J.]** **[D.B. BHOSALE, J.]**

प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विनंती करील. आवश्यकता पडल्यास याचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन सदर प्रलंबीत कामे त्वरीत पूर्ण करुन घेण्यात येईल. (ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. (iii) **विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करेल, त्या तारखेपासून सुट देण्यात येईल.** *(2009 NBP143)*

**(१.२०)** त्यानंतर शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने दिनांक ७ ऑगस्ट २००९ रोजी एक अतितात्काळ परिपत्रक (क्र.संकीर्ण-२००९/(संप/०९)/विशि-१) काढून सर्व विद्यापीठांना व महाविद्यालयांना असे कळविले की, :-

"(i) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबीत प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विनंती करील. आवश्यकता पडल्यास याचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन सदर प्रलंबीत कामे त्वरित पूर्ण करून घेण्यात येतील.

(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबिर आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(iii) **विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करील, त्या तारखेपासून सूट देण्यात येईल.**"

**(१.२१)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी एका बाजूला व दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांच्यासह मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेशजी टोपे यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत जे निर्णय झाले त्या बैठकीच्या इतिवृत्तात परिच्छेद ५ पुढील प्रमाणे आहे.:-

"(५) विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतूदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) **वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील.** याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडे समन्वय करण्यासाठी शासनाचे दोन अधिकारी व एमफुक्टोचे दोन प्रतिनिधी यांची एक समिती पाठपुराव्यासाठी नेमली जाईल. याबाबत इतर कार्यवाही शासन पत्र दिनांक ३१ जुलै, २००९ व ४ ऑगस्ट, २००९ च्या पत्रातील परिच्छेद (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल. तथापि, अशासकीय व संघटनांच्या प्रतिनिधींना कोणताही भत्ता व प्रवास खर्च शासनाकडून मिळणार नाही." *(2009 NBP121)*

**(१.२२)** एवढे सारे लेखी ठरल्यावर ३ महिने झाले तरी कोणताही निर्णय झाला नाही म्हणून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांनी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना व्यक्तीशः भेटून चर्चेसाठी वेळ देण्याची विनंती केली. त्यानुसार मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या मंत्रालयातील दालनात दिनांक १६ नोव्हेंबर २०११ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी ही चर्चा पार पडली. या चर्चेत मा. उच्च शिक्षण मंत्री श्री. राजेश टोपे यांनी आपली केंद्रिय उच्च शिक्षण मंत्री श्री. कपिल सिब्बल यांच्याशी नुकतीच दिल्लीत भेट झाली. त्यावेळी ते मला म्हणाले की "We have resolved the problem of Teachers in Maharashtra appointed between 1991-2000. Their services shall be counted from their date of appoinment." या चर्चेत श्री. टोपे पुढे असेही म्हणाले की, "Cases of all the Teachers appointed between 1991-2000 have been approved by the UGC. **Their services now will have to be counted from their date of appoinment.**" याच चर्चेच्या वेळी मा. प्रधान सचिव उच्च शिक्षण यांनी असे सांगितले की, "There is no doubt about these two letters issued by UGC. I agree with the minister that the problem is solved by the UGC. **The letters are very clear. Need no further clarification.**" असे असतांना एका उपसचिवांने "मग यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाने जी वेगवेगळी पत्रे पाठविली त्यांचे काय करावयाचे?" असे खुसपट काढले. त्या उपसचिवाचे म्हणणे असे की, "विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्रातील ४८३७ शिक्षकांना Exemption दिलेले होते व त्यापैकी ३१५८ शिक्षकांना दिलेले Exemption पुढे आयोगाने रद्द केले. त्याचे काय करायचे?" याबाबत सुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून खुलासा मागवावा लागेल.

**(१.२३)** १९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० पावेतो महाराष्ट्रातील सर्व नेमणूका एकाच स्थितीचे दर्शन घडविणाऱ्या असतांना, समान स्थितीमध्ये समान वागणूक न देता, विद्यापीठ अनुदान आयोगाने गेल्या १०-१५ वर्षात

## *महाराष्ट्र राज्याचे मा. उच्च शिक्षण मंत्री व मा. मुख्य सचिव यांची ऑगस्ट २००९ मधील लेखी भूमिका*

***(१) दिनांक : २४ जुलै, २००९ :-*** "**(i) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी विनंती करील. (ii)** विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसाच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. **विद्यापीठ अनुदान आयोगाने सूट देण्यासंदर्भातील छाननीचे बरेचसे कामकाज त्यांच्या स्तरावर पूर्ण केले असल्याचे कळते.**"

***(२) दिनांक : ३१ जुलै, २००९ :-*** "३. महाराष्ट्रातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यांनी सन १९९१ ते ९९ या कालावधीत बरेचसे बिगर नेट-सेट उमेदवार अधिव्याख्याता म्हणून नेमलेले आहेत. अशा अधिव्याख्यात्यांना नेट सेट अर्हतेपासून सूट देण्यासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार आणि मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार संबंधित विद्यापीठांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविलेले/पाठवावयाचे आहेत. ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी शासन खालीलप्रमाणे उपाययोजना करणार आहे. :- **(i)** राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विनंती करील. आवश्यकता पडल्यास याचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन सदर प्रलंबीत कामे त्वरित पूर्ण करुन घेण्यात येईल. **(ii)** विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आंत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. **(iii) विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करेल, त्या तारखेपासून सुट देण्यात येईल.** विद्यापीठ अनुदान आयोगाने सुट देण्यासंदर्भातील छाननीचे बरेचसे कामकाज त्यांच्या स्तरावर पूर्ण केले असल्याचे कळते."

***(३) दिनांक : २६ ऑगस्ट, २००९ :-*** "(५) विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतूदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, **नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील** याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडे समन्वय करण्यासाठी शासनाचे दोन अधिकारी व एमफुक्टोचे दोन प्रतिनिधी यांची एक समिती पाठपुराव्यासाठी नेमली जाईल. याबाबत इतर कार्यवाही शासन पत्र दिनांक ३१ जुलै, २००९ व ४ ऑगस्ट, २००९ च्या पत्रातील परिच्छेद (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल. तथापि, अशासकीय व संघटनांच्या प्रतिनिधींना कोणताही भत्ता व प्रवास खर्च शासनाकडून मिळणार नाही."

तुकड्या तुकड्याने अनेक निर्णय घेतले व त्यामुळे या वर्गवारीतील शिक्षकांची सुद्धा अनेक तुकड्यांमध्ये विभागणी झाली होती. विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या ८ जुलै २०११ रोजीच्या त्या शेवटच्या निर्णयामुळे या प्रवर्गातील शिक्षकांसाठी यापूर्वी घेतलेल्या निर्णयांचे अनेक तुकडे एकत्र आले असून **आता या सर्वांसाठी एकच निर्णय झालेला आहे** एवढी साधी गोष्ट या उपसचिवांना कळत नसेल तर त्या पदावर काम करण्याची लायकी ते गमावून बसले आहेत एवढाच त्याचा अर्थ होतो.

**(१.२४) मा. सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निर्णय, त्या आधारावर अनेक उच्च न्यायालयांनी दिलेले निर्णय, तात्पुरत्या शिक्षकांची सेवासुद्धा नेमणूकीच्या तारखेपासूनच धरली पाहिजे हे विद्यापीठ अनुदान आयोगाचे गेल्या अनेक वर्षापासून अस्तित्वात असलेले नियम, गेल्या १०-१५ वर्षात उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रात निर्माण करुन ठेवलेली स्थिती, आता खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ८ जुलै २०११ रोजीच्या बैठकीत फक्त महाराष्ट्रासाठी निर्णय घेवून स्पष्ट शब्दात या प्रत्येक शिक्षकांची सेवा नेमणूकीच्या दिनांकापासून धरावी असा दिलेला निर्णय**, "विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख कळवेल त्या तारखेपासून त्या सर्व शिक्षकांची सेवा धरली जाईल" अशी शासनाने अनेकवार दिलेली लेखी आश्वासने, खुद्द मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी व प्रधान सचिवांनी "नेमणूकीच्या दिनांकापासूनच ही सेवा धरावी लागेल" अशी स्पष्टपणे घेतलेली भूमिका, लक्षात घेता एका उपसचिव दर्जाच्या कपटी व कारस्थानी अधिकाऱ्याने सबंध महाराष्ट्राचे उच्च शिक्षण क्षेत्र वेठीस धरावे ही आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट आहे. एवढे सारे झाल्यावर "पाहिजे तर पुढच्या ८-१० दिवसात या उपसचिवाने विमानाने दिल्लीला जावे व त्यांना काय संशय असतील

## महाराष्ट्र राज्याचे मा. उच्च शिक्षण मंत्री व मा. मुख्य सचिव यांच्या भूमिकेच्या विरोधात त्याच ऑगस्ट २००९ मध्ये लेखी भूमिका कळविणारे रा. गो.जाधव या उपसचिवाचे हेच ते कुप्रसिद्ध पत्र

### GOVERNMENT OF MAHARASHTRA
### No. UGC 2009(332/09)UNI-I, : Date : 24th August 2009

**Higher & Technical Education Department, Mantralaya, Mumbai-400 032.**

To,
**The Chairman,**
University Grant Commission,
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-110 002.

**Subject :** Regarding grant of exemption and regularization of services of non NET/SET Teachers recruited during 1991 to 1999 by UGC.

**Reference :** Your Letter No. F.1-11/97(PS), dated 12th August 2009.

Dear Sir,

With reference to your above referred letter, the following officers of this State Government attended the University Grants Commission on 18th August 2009 :

. Shri. J.S.Saharia, Principal Secretary

. Smt. Seema Dhamdhere, Joint Secretary

. Smt. S.A.Ghorpade, Under Secretary.

2. These three officers briefed the Chairman & the Secretary, U.G.C. and the Member of the Exemption Committee about the various issues involved in grant of exemption and regularization of services of Non NET/SET teachers in Maharashtra as mentioned below :-

2.1 Can the exemption be granted and / or regularization done in view of the judgment of the Hon'ble Supreme Court dated 27 th February, 2009 in the case of G.V.Chandrashekhara v/s Government of Karnataka which has laid down that "Unless the appointment is in terms of relevant rules and after a proper competition amongst the qualified persons the same would not confer any right on the appointee" etc.

2.2 If the exemption can be granted and/or services can be regularised then which date should be taken for exemption and/or regularizing the services (for non NET/SET teachers)

. date of exemption

. date of appointment

. date of order

. any other date

3. The State Government officers further summarized the facts (as understood by the State Government) and the implications of any decision taken by the U.G.C. as mentioned below :-

**Facts :**

. NET/SET is compulsory as per the various notifications of UGC.

. Only UGC is authorised to grant exemption from NET/SET and to decide the date from when to regularise the services of these exempted teachers.

. Government of Maharashtra has vide its G.R. No. NGC-1201/11815(38/01)/Vishi-4, dated 18th October 2001 clarified that NET/SET is compulsory for all teachers appointed during 1991-99 and will draw salary in the lowest scale till they pass NET/SET.

. Hon'ble High Court, Mumbai has upheld the above GR through its various judgments from 2002 to 2008. (especially W.P. No. 5022/2001 dt. 15/18/20 Feb. 2002, W.P. No.5375/2001 dt. 28.10.2002, W.P. No. 5782/2001 dt. 18.4.2004 and 4266/2006 dt. 27.11.2008).

**Implications**

. Any date for exemption and/or regularizing the services may be violative of the aforesaid judgment of the Hon'ble Apex Court.

. It will also disturb the seniority list completely.

. This will amount to awarding the non NET/SET teachers over those who worked diligently and obtained NET/SET earlier. NET/SET holders may therefore launch agitation.

. Nobody will take NET/SET seriously thereafter and not try to pass/acquire it.

. Non NET/SET teachers will claim higher pay scales which will add to the financial burden of the State.

4. In view of above, you are requested to kindly look into all the cases (including those recently decided) of Non NET/SET teachers submitted by the various Universities of Maharashtra to U.G.C. for consideration.

Yours faithfully,
**(R.G. Jadhav)**
Deputy Secretary to Government.

**Encl :** (1) Note of Law Secretary, Government of Maharashtra, dated 12 th June 2009 on supreme Court judgment dated 27.02.2009 (2) Maharashtra Government Resolution No. NGC/1201/11815(38/01)-Vishi-4, dated 18.10.2001. (3) High Court Judgment in W.P. No. 5022/2001, dated 15/18/20 Feb. 2002. (4) High Court Judgment in W.P. No. 5375/2001, dated 28.10.2002 (5) High Court Judgment in W.P. No. 5782/2001, dated 18.04.2002 (6) High Court Judgment in W.P. No. 4266/2006, dated 27.11.2008

**Copy to -** The Secretary, University Grants Commissions, Bahadur Shah Zafar Marg, New Delhi, for information and necessary action.

ते फेडून घ्यावे." असा निर्णय व्हावा. ही अत्यंत दुःखद व दुर्दैवी गोष्ट होय.

**(१.२५.१)** उपसचिव दर्जाच्या ज्या अधिकाऱ्याने महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्रा वेठीला धरले आहे **त्या अधिकाऱ्यांचे नाव रा.गो.जाधव असे असून त्यांचा तपशीलवार परिचय महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्राला करवून देण्याची दुर्दैवी वेळ महाराष्ट्र प्राध्यापक महासंघावर आलेली आहे.** त्याचा खरा परिचय मा. उच्च शिक्षण मंत्री व मा. विद्यमान उच्च शिक्षण सचिव यांना सुद्धा होणे अत्यंत आवश्यक आहे.

**(१.२५.२)** ऑगस्ट २००९ मध्ये मा. उच्च शिक्षणमंत्री महोदय निसंदिग्ध शब्दात ज्यावेळी प्राध्यापकांना **"राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विनंती करील. आवश्यकता पडल्यास याचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन सदर प्रलंबित कामे त्वरीत पूर्ण करून घेण्यात येतील."** अशी आश्वासने लेखी स्वरुपात देत होते. त्यावेळी खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यालयात जावून या लोकांना एक्झ्मशन देवू नका अशी विनंती विद्यापीठ अनुदान आयोगाला करणाऱ्या अधिकाऱ्यात रा.गो.जाधव हे प्रमुख होते. इतकेच नव्हे तर **याच रा.गो.जाधवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला तसे लेखी पत्र स्वतःच्या सहिने २४ ऑगस्ट २००९ रोजी दिले होते.**

**(१.२५.३)** मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या व राज्य शासनाच्या भूमिकेच्या विरुद्ध खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यालयात जावून या रा.गो.जाधवांनी नुसता प्रचारच केला नाही तर आपल्या स्वतःच्या सहिने विद्यापीठ अनुदान आयोगाला २४ ऑगस्ट २००९ रोजी पत्र पाठवून हा प्रचार लेखी स्वरुपात कळविला. **विद्यापीठ अनुदान आयोगाने जर एक्झ्मशन दिले तर त्याचे काय परिणाम (Implications) होतील? याबाबतचा रा.गो.जाधव यांच्या पत्रातील पुढील मजकूर पहा.:-**

"**Implications**

. Any date for exemption and/or regularizing the services may be violative of the aforesaid judgment of the Hon'ble Apex Court.

. It will also disturb the seniority list completely.

. This will amount to awarding the non NET/SET teachers over those who worked diligently and obtained NET/SET earlier. NET/SET holders may therefore launch agitation.

. Nobody will take NET/SET seriously thereafter and not try to pass/acquire it.

. Non NET/SET teachers will claim higher pay scales which will add to the financial burden of the State."

खुद्द उच्च शिक्षणमंत्र्यांच्या भूमिकेला बिब्बा भरण्याचे हे कार्य करणाऱ्या उपसचिव दर्जाच्या या अधिकाऱ्याचे करावे तेवढे कौतूक थोडेच आहे.

**(१.२५.४)** श्री रा.गो.जाधव यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला लिहिलेल्या २४ ऑगस्ट २००९ च्या या पत्रात एक्झ्मशन जर तुम्ही दिले तर ते सर्वोच्च न्यायालयाच्या विरोधातील कृत्य होईल "may be violative of the aforesaid judgment of the Hon'ble Apex Court" असा उल्लेख केला आहे? हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय कोणता हे त्यांनी त्यांच्या याच पत्राच्या परिच्छेद २.१ मध्ये नमुद केले आहे. हा जो सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय त्यांनी दाखविला आहे. त्याबाबतची गम्मत सुद्धा पहाण्यासारखी आहे. १९९४ च्या नेट-सेट बाबतच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा ते उल्लेखही करीत नव्हते. पण २७ फेब्रुवारी २००९ चा नेटसेटशी संबध नसलेला एक जनरल निर्णय ते 'कोट' करीत होते. १९९१ ते १९९९ या काळात २००९ चा नेटसेटशी अजिबात संबंध नसलेला २७ फेब्रुवारी २००९ चा मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय समोर करुन एक्झ्मशन देणे योग्य नाही असे ते विद्यापीठ अनुदान आयोगाला धमकावीत होते. **सन १९९१ ते सन १९९९ या काळात मा. सर्वोच्च न्यायालयाचा २७ फेब्रुवारी २००९ चा निर्णय तुमच्या स्वप्नात कसा आला नाही? असे या रा.गो.जाधवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला विचारले नाही हे त्या विद्यापीठ अनुदान आयोगाचे नशिबच म्हटले पाहिजे.**

**(१.२५.५)** मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या धोरणाच्या विरोधात सातत्त्याने कारवाया करण्याचे धोरण या उपसचिवांनी स्विकारले होते. मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी विधानपरिषदेत दिनांक १७ डिसेंबर २००८ रोजी ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने एक्झ्मशन दिले आहे त्यांच्या बावत शासनाच्या वतीने पुढील प्रमाणे आश्वासन दिले :- **"मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, या सदंर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे.** तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी संपण्याच्या अगोदर हा जी.आर. काढण्यात येईल, **जर २४ तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी. आर. काढण्यात येईल.... तसेच हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल."**

"हे करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमच्या संदर्भात हे कॅसचे काम पूर्ण करावयाचे आहे त्यासाठीदेखील कॅम्प्स घेऊन येत्या दोन महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. अशा प्रकारे हे एकूण सर्वच काम म्हणजे **नियमित करण्याचे काम एक महिन्यात आणि त्यापुढे कॅसचे काम दोन महिन्यात असे तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल."** असेहि आश्वासन त्यांनी दिले. या विभागाचे मंत्रालयात नेतृत्व करणाऱ्या रा.गो.जाधवांना पुढच्या ८-१० महिन्यात याबाबत काही उजेड पाडता आला नाही, याकडे एकदा काणाडोळा करता येईल पण जुलै व ऑगस्ट २००९ मध्ये लेखी पत्रे देऊन मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी घेतलेल्या भूमिकेच्या विरोधात बाहेरच्या लोकांची सूपारी घेवून हे रा.गो.जाधव आपले उपसचिवपद चालवित होते हे स्पष्ट दिसून येते. विद्यापीठ अनुदान आयोगाला २४ ऑगस्ट, २००९ रोजी रा.गो.जाधव यांनी जी दोन पत्रे दिलीत त्यातील एका पत्रात युजीसीला त्यांनी सरळ सरळ अशी धमकी दिली की, "तुमच्याकडून कंटेम्ट ऑफ कोर्ट होत आहे." विद्यापीठ अनुदान आयोगाला दिलेल्या २४ ऑगस्टच्या पत्रात या अधिकाऱ्यांने असे म्हटले आहे की, "This is a serious issue which is to be set right by the UGC. It is learned that some private organisations are planning to file Criminal cases against the UGC." **मंत्रालयातील काम सोडून खाजगी संघटनांच्या वतीने धमक्या देण्याचे काम सुद्धा करण्यासाठी रा.गो.जाधव यांना बाहेरून काही पगार मिळत होता काय? मा. मंत्रिमहोदयांच्या निर्णयाविरुध्द त्यांनी पत्र दिले. तो देण्याचा त्यांना अधिकार कोठून मिळाला? मंत्र्याच्या धोरणाविरुध्द त्यांनी हे पत्र कसे काय लिहीले? हे त्यांना कोण विचारणार?**

**(१.२५.६) दिनांक १६ नोव्हेंबर २०११ रोजी मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. उच्च शिक्षण सचिव यांच्याशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी झालेली अत्यंत उपयुक्त चर्चा या रा.गो.जाधवांनी पूर्णपणे उध्वस्त केली.** असे आज स्पष्टपणे दिसून येते. मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या मंत्रालयातील दालनात दिनांक १६ नोव्हेंबर २०११ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी ही चर्चा पार पडली. या चर्चेत मा. उच्च शिक्षण मंत्री श्री. राजेश टोपे यांनी

*राज्यशासनाची भूमिका पुढीलप्रमाणे :-*

***''नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील.''***

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या ठरावाचा परिच्छेद १.२१ पहा)*

आपली केंद्रिय उच्च शिक्षण मंत्री श्री. कपिल सिब्बल यांच्याशी नुकतीच दिल्लीत भेट झाली. त्यावेळी ते मला म्हणाले की "We have resolved the problem of Teachers in Maharashtra appointed between 1991-2000. Their services shall be counted from their date of appoinment." या चर्चेत श्री. टोपे पुढे असेही म्हणाले की, "Cases of all the Teachers appointed between 1991-2000 have been approved by the UGC. Their serivices now will have to be counted from their date of appoinment." **मंत्रीमहोदयांच्या या विधानांचा कार्यवृत्तामध्ये अजिबात उल्लेख नाही.** याच चर्चेच्या वेळी मा. प्रधान सचिव उच्च शिक्षण यांनी असे सांगितले की, "There is no doubt about these two letters issued by UGC. I agree with the minister that the problem is solved by the UGC. The letters are very clear. Need no further clerification.'' **मा. प्रधान सचिव यांनी हे जे सांगितले त्याचा या कार्यवृत्तामध्ये अजिबात उल्लेख नाही.**

**(१.२५.७)** रा.गो.जाधव या नावाच्या उपसचिवाने या बैठकीत जे विषवमन केले ते मात्र तपशीलवारपणे या कार्यवृत्तात नोंदले गेले आहे. **त्याच्या या विष वमनाचे प्रतिनिधीत्व करणारे कार्यवृत्तात नमूद असलेले परिच्छेद ३ मधिल दोन उपपरिच्छेद पुढील प्रमाणे आहेत.**

"d) सदर सुट रद्द केलेल्या अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०११ च्या आदेशानुसार पुन्हा सुट दिल्याचे व त्याचप्रमाणे दिनांक २६ ऑगस्ट २०११ च्या पत्रान्वये त्यांना **त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून CAS चे लाभ देण्याचे ग्राह्य धरण्यात यावे किंवा कसे याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उक्त दोन्ही पत्रान्वये स्पष्ट केलेले नाही, त्यामुळे याबाबत विद्यापीठ** अनुदान आयोगाकडून स्पष्टीकरण प्राप्त करणे आवश्यक वाटते.

e) विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या दिनांक २७ ऑगस्ट, २००९ च्या पत्रान्वये राज्यातील बिगर नेट/सेट अध्यापकांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत नेट/सेट परीक्षा उत्तिर्ण होणे अनिवार्य असल्याचे आदेश दिले. तथापि आता, उक्त दिनांक १६ ऑगस्ट, २०११ च्या पत्रान्वये सन १९९१ ते सन २००० पर्यंतच्या बिगर नेट/सेट अधिव्याख्यात्यांना सरसकट नेट/सेट मधुन सुट दिल्याचा निर्णय घेतला. **या आदेशामुळे उक्त दिनांक २७ ऑगस्ट, २००९ चे आदेश रद्द झाले किंवा कसे** याबाबतही विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांची दिनांक १६ व २६ ऑगस्ट २०११ च्या पत्रात स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे या संदर्भातही विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्पष्टीकरण प्राप्त करणे आवश्यक वाटते."

आपल्या मनातील विषारी विचारांना विद्यापीठ अनुदान आयोगाने साथ दिलेली नाही. हे स्पष्ट कळून चुकल्यामुळे व विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय फेटाळून लावण्याचे अधिकार उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याला भारतीय घटनेने दिलेले नसल्यामुळे त्यांनी **"हे असे आहे किंवा कसे?"** अशी तृतियपंथी भाषा दोनही ठिकाणी वापरलेली आहे.

"१९ सप्टेंबर १९९१ ते ३ एप्रिल २००० पावेतो महाराष्ट्रातील सर्व नेमणूका एकाच स्थितीचे दर्शन घडविणाऱ्या असतांना, समान स्थितीमध्ये समान वागणूक न देता, विद्यापीठ अनुदान आयोगाने गेल्या १०-१५ वर्षात तुकड्या तुकड्याने अनेक निर्णय घेतले व त्यामुळे या वर्गवारीतील शिक्षकांची सुद्धा अनेक तुकड्यांमध्ये विभागणी झाली होती. विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या ८ जुलै २०११ रोजीच्या त्या शेवटच्या निर्णयामुळे या प्रवर्गातील शिक्षकांसाठी यापूर्वी घेतलेल्या निर्णयांचे अनेक तुकडे एकत्र आले असून **आता या सर्वांसाठी एकच निर्णय झालेला आहे** एवढी साधी गोष्ट या उपसचिवांना कळत नसेल तर त्या पदावर काम करण्याची लायकी ते गमावून बसले आहेत एवढाच त्याचा अर्थ होतो." हे पुन्हा नमुद करावेसे वाटते.

**(१.२५.८)** विधानमंडळ अधिवेशनाच्या वेळी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी नागपूर येथे आपण चर्चा करु. असे १६ नोव्हेंबर २०११ च्या चर्चेच्या वेळी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी सांगितले होते. सुरुवातीला १२ डिसेंबर ही तारिख ठरत असतांना आपली डायरी पाहून १२ तारखेला काही महत्वाचा कार्यक्रम असल्यामुळे **"१३ डिसेंबर २०११ रोजी ही बैठक नागपूर येथे होईल. आजच्या कार्यवृत्तात ही गोष्ट नमुद करा म्हणजे वेगळे पत्र देण्याची गरज नाही"** असे खुद्द उच्च शिक्षण मंत्र्यांनी चर्चेच्या वेळी सांगितले असतांना चर्चेच्या कार्यवृत्तातून तो भाग या उपसचिवांनी पूर्णपणे गाळून टाकला. या सर्व बाबी महासंघाच्या सचिवांनी ३० नोव्हेंबर २०११ रोजी एक पत्र लिहून उच्च शिक्षण मंत्र्यांना कळविल्या. अशा रितीने १३ डिसेंबरची बैठक उध्वस्त करण्यात रा.गो.जाधव यशस्वी झाले. १२ डिसेंबरला त्यांनी संघटनेच्या अध्यक्षांना एक फॅक्स पाठविला व "१३ डिसेंबरला बैठकीसाठी या!" असे कळविले. **महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातील प्रतिनिधी १२ तारखेच्या एकट्या अध्यक्षांना पाठविलेल्या फॅक्सप्रमाणे कसे पोचू शकतील याची कल्पना महाराष्ट्राचा भूगोल ठावूक नसलेल्या उपसचिवांना कशी येणार?**

**(१.२५.९)** मंगळवार, दिनांक २२ डिसेंबर २००९ रोजी विधानपरिषदेमध्ये उपसचिवांच्या या वर्तनाची तपशीलवार चर्चा झाली. "बाहेरच्या लोकांची 'सुपारी' घेऊन जर कुणी अधिकारी मंत्रालयात काम करीत असेल तर ती चुकीची गोष्ट आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाला २४ ऑगस्ट, २००९ रोजी रा.गो.जाधव या उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांनी दोन पत्रे देऊन त्यातील एका पत्रात युजीसीला अशी धमकी दिली की, "तुमच्याकडून कंटेम्ट ऑफ कोर्ट होत आहे." विद्यापीठ अनुदान आयोगाला दिलेल्या २४ ऑगस्टच्या पत्रात या अधिकाऱ्यांने असे म्हटले आहे की, "This is a serious issue which is to be set right by the UGC. It is learned that some private organisations are planning to file Criminal cases against the UGC." मंत्रालयातील काम सोडून खाजगी संघटनांच्या वतीने धमक्या देण्याचे काम मंत्रालयातून केव्हापासून सुरु झाले? मी या ठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, २४ तारखेला मा. मंत्रिमहोदयांच्या निर्णयाविरुध्द त्यांनी पत्र दिले. तो देण्याचा त्यांना अधिकार नाही. मंत्र्याच्या धोरणाविरुध्द त्यांनी हे पत्र कसे काय लिहीले?" अशी ज्यावेळी सभागृहात विचारणा करण्यात आली त्यावेळी मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी " नेट-सेटच्या संदर्भात एक्झम्शन देण्याचा विषय यु.जी.सी.मध्ये चालू आहे. साधारणतः आठ हजार अधिव्याख्याते आहेत. त्यामुळे याबाबतचे निर्णय लवकर व्हावेत यादृष्टिकोनातून एक समिती नेमून लवकरात लवकर ते करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने संपकऱ्यांबरोबर चर्चा करुन त्या गोष्टी ठरविल्या होत्या. परंतु सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सांगितले की, **सचिवांनी तेथे जाऊन हे करु नका असे म्हटले आहे. सभापती महोदय, यासंदर्भात ज्या काही लेखी किंवा तोंडी सूचना केल्या असतील या दोन्ही मुद्याच्या संदर्भात सभागृहाची भावना लक्षात घेऊन शासन निश्चित प्रकारे चौकशी करील. आणि त्यांच्याकडून कळत न कळत किंवा जाणीवपूर्व चूका झाल्या असतील तर त्या संदर्भात निश्चितप्रकारे जाब विचारण्यात येईल" असे आश्वासन दिले.**

श्री.रा.गो.जाधव या सर्व गोष्टी कळत न कळत करीत आहेत यावर कोण विश्वास ठेविल? खरे म्हणजे हा कटू इतिहास विसरण्याचे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ठरविले होते पण रा.गो.जाधव या नावाच्या या अधिकाऱ्यांने केलेल्या उपरोक्त जाणिवपूर्वक गैरवर्तूणूकीमुळे त्याची चौकशी करण्यात यावी व अशा चौकशीच्या वेळी पुरावे सादर करण्याची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला संधी

*आयोगाचा अंतिम निर्णय पुढीलप्रमाणे :-*

**"The commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 19, 1991 to April 3, 2000. Therefore the services of such teachers for all purposes should be counted from the date of their regular appointment."**

*(महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या ठरावाचा परिच्छेद १.१४ ते १.१६ पहा)*

देण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

**(१.२६)** उपरोक्त स्थिती लक्षात घेता पुढील दोन बाबतीत शासनाने तातडीने कारवाई करण्याच्या सूचना द्याव्यात अशी विनंती करण्यात येत आहे.:-

(१) शासनाने ७ ऑगस्ट २००९ रोजी विद्यापीठांना एक परिपत्रक पाठवून "(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबिर आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. (iii) विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करील, त्या तारखेपासून सूट देण्यात येईल." असे यापूर्वीच कळविले आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना या दोनहि बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र आता प्राप्त झालेले असल्याने शिबिरांचे आयोजन करुन या सर्व शिक्षकांच्या बाबतीत स्थाननिश्चिती व वेतननिश्चितीची कारवाई विद्यापीठांनी पुढील १५ दिवसात पूर्ण करावी.

(२) मुळ शासननिर्णयात विद्यापीठांकडे हे अधिकार शासनाने सोपविले असल्यामुळे शासनाच्या यापूर्वी देण्यात आलेल्या उपरोक्त सूचनाप्रमाणे काही विद्यापीठामध्ये स्थाननिश्चिती व वेतननिश्चितीची कारवाई पूर्ण झालेली असून अशी प्रकरणे सहसंचालकांकडे सोपविली आहेत. त्याबाबतीत अशा सहसंचालकांनी शिबिरांचे आयोजन करुन त्यांच्या स्तरावरील कारवाई पुढील एक महिन्यात पूर्ण करावी.

**(२.१)** सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करतांना महाराष्ट्रामध्ये "विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक" या संवर्गाला शेवटच्या पंक्तीला बसविण्यात आले. इतर सर्व संवर्गांना ही वेतनश्रेणी लागू केल्यानंतर कितीतरी विलंबाने त्यांना ही वेतनश्रेणी लागू करण्यात आली. जो प्रकार वेतनश्रेणी लागू करण्याबाबत झाला तसाच प्रकार थकबाकी अदा करण्याबाबत सुद्धा होत आहे हे अत्यंत दुर्दैवी व दुःखद होय.

**(२.२)** १ एप्रिल २००९ पासून प्रत्यक्ष नवी वेतनश्रेणी लागू होईपर्यंतच्या काळातील थकबाकी शासकीय कर्मचाऱ्यांसह इतर सर्व संवर्गांना ऑक्टोबर २००९ मध्ये रोखीने देण्यात आली. फक्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना मात्र त्यानंतर २ वर्षाचा कालावधी लोटून गेला तरी ती थकबाकी देण्यात आलेली नाही.

**(२.३)** शासकीय कर्मचाऱ्यांसह इतर सर्व संवर्गांना १ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २००९ या कालखंडातील थकबाकी ५ वार्षिक भागामध्ये देण्याचा शासनाने निर्णय घेतला व त्याप्रमाणे थकबाकीचा पहिला भाग ऑक्टोबर २००९ मध्ये, दुसरा भाग जुलै २०१० मध्ये व तिसरा भाग जुलै २०११ मध्ये प्रत्यक्षात रोखीने अदा करण्यात आलेला आहे. सेवानिवृत्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांनासुद्धा ५ वार्षिक भागापैकी थकबाकीचे ३ वार्षिक भाग वरील प्रमाणेच प्रत्यक्षात अदा करण्यात आलेले आहेत.

**(२.४)** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी एका बाजूला व दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांच्यासह मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेशजी टोपे यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीत जे निर्णय झाले त्या बैठकीच्या इतिवृत्तात परिच्छेद १ पुढील प्रमाणे आहे.:-

"केंद्र शासनाने पाठविलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतन सुधारणा विषयीची समग्र योजना राज्य शासनाने विचारात घेऊन **त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक १२.८.२००९ रोजी निर्गमित केला.** या योजनेची अंमलबजावणी करतांना केंद्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य मिळावे असे उद्दीष्ट राहील. हे अर्थसहाय्य केंद्र शासनाकडून **न मिळाल्यास ८० टक्के थकबाकीची रक्कम राज्य शासन, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे देईल.**" *(2009 NBP121)*

**(२.५)** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत थकबाकी अदा करण्याच्या संदर्भात जी सापत्नभावाची वागणूक देण्यात येत आहे त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असून राज्याच्या मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी व मुख्य सचिवांनी दिलेला शब्द पाळल्या गेला पाहिजे अशी मागणी करण्यात येत आहे.

**(३.१)** उच्च शिक्षण विभागातील विभागीय कार्यालयामध्ये काही सहसंचालक आपण एखाद्या स्वतंत्र राज्याचे राजे आहोत या थाटात वागत आहेत. विशेषतः "**सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे झालेली वेतन निश्चिती अंतिम होण्यापूर्वी त्यात काही चूक झालेली असल्यास ती दुरुस्त करण्याचा अधिकार**" व "**यापूर्वी विधिवतरित्या मान्य करण्यात आलेल्या 'अस्तित्विय वित्तलब्धी' कापून काढण्याचा अनधिकार**" या दोहोची त्यांनी बरीच गफलत करुन सरमिसळ केली असे दिसून येते.

**(३.२)** या देशातील घटनेप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने एकदा निर्णय दिला की त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालयालाच आहे पण इथे मात्र त्याच सहसंचालकाने सही शिक्क्याने मान्य केलेली वित्तलब्धी तोच सहसंचालक किंवा त्याच्या कार्यालयातील वित्त अधिकारी किंवा अनेक प्रसंगी

## महाराष्ट्र शासन : क्र.संकीर्ण-२००९/(संप/०९)/विशि-१

***उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ : दिनांक ७ ऑगस्ट, २००९***

**अतितात्काळ**

प्रति,
**कुलसचिव**, सर्व अकृषि विद्यापीठे
**विषय** :- संपावर असलेल्या अध्यापकाबाबत
महोदय,

महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटीज अँड कॉलेज टिचर्स ऑर्गनाझेशन्स दि. १४ जुलै, २००९ पासून त्यांच्या मागण्यांसाठी संपावर आहेत. त्यांनी सादर केलेल्या निवेदनावरुन त्यांच्या प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे दिसून येतात.

(i) राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालये/संस्था यामधील शिक्षक व इतर समकक्ष पदांना केंद्र शासनाने (यु.जी.सी.) शिफारस केलेल्या वेतनश्रेणी, भत्ते व इतर आनुषंगिक लाभ देण्यात यावेत.

(ii) सन १९९१ ते १९९९ या कालावधीत नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांसाठी नेट/सेट लागू नसल्याने त्यांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून नियमित धरण्यात येऊन सर्व फायदे देण्यात यावेत.

२ ........
३ ........
४ ........
५ ........

**६. सदर बाब कायद्यात बसत नसल्यामुळे ती मान्य करता येत नसली तरी**, अधिव्याख्यात्यांना मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्याचे ठरविले आहे.

(i) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबीत प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विनंती करील. आवश्यकता पडल्यास याचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन सदर प्रलंबीत कामे त्वरीत पूर्ण करून घेण्यात येतील.

**(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबिर आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.**

**(iii) विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करील, त्या तारखेपासून सूट देण्यात येईल.**

(iv) विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये सन १९९१-९९ या कालावधीत बिगर नेट/सेट अधिव्याख्याता/शिक्षकांच्या प्रकरणाचा केंद्र शासन/ यु.जी.सी.कडे पाठपुरावा करण्यासाठी एक तदर्थ समिती गठित करण्यात येईल.

७ ........

आपला
सही/- **(विकास तु. कदम)**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

एखादा "बाबू"सुद्धा चुकीची ठरवून 'रिकव्हरी' काढतो. हा केवळ पोरखेळ दिसत असला तरी त्यामागचे भ्रष्टाचाराचे हेतू लपून रहात नाहीत. असे करतांना मा. उच्च न्यायालयाने व सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय नजरेखालून घालण्यास सुद्धा सहसंचालकांच्या कार्यालयाला वेळ नसतो.

**(३.३)** दिनांक १६ डिसेंबर २००८ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या *(Syed Abdul Qadir and ors. Vs. State of Bihar and ors. 2009* reported in *(2009) 3 Supreme Court Cases 475*,) परिच्छेद २७ मध्ये पुढील प्रमाणे निर्णय आहे.:-

"This Court, **in a catena of decisions,** has granted relief against recovery of excess payment emoluments/allowances if (a) the excess amount was not paid on account of misrepresentation or fraud on the part of the employee and (b) if such excess payment made by the employer by applying a wrong principle for calculating the pay/allowances on the basis of a particular interpretation of rule/order, which is subsequently found the erroneous."

**(३.४)** मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दिनांक २२ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या निर्णयातील परिच्छेद ४ पुढील प्रमाणे आहे. :-

"**By now, it is a settled position of law that recovery from the salary/pension of an employee cannot be made, if the amount in excess was paid to such an employee for the reasons not attributed to such an employee.** It is not the case of the respondents that the stagnation amount was paid to the members of the petitioner association on account of any misrepresentation made by such members."

**(३.५)** मा. उच्च न्यायालयाने याच प्रकरणात दिलेल्या उपरोक्त निर्णयातील परिच्छेद ६ पुढील प्रमाणे आहे. :-

"**The impugned communication dated 10.3.2008 and 18.3.2010 are therefore quashed and set aside.** It is held that the respondents are not entitled to recover the amount from the pension of the petitioners. Insofar as the amount which is already recovered from the pension of the members of the petitioner association, it is directed that such amount shall be returned to the employees from whom it is deducted within a period of three (3) months from today alongwith the interest at the rate of 12% per annum."

**(३.६)** एखाद्याची निसर्ग न्यायानुसार बाजू ऐकून घेण्याचे भान न ठेवता अस्तित्विय वित्तलब्धीची कापाकापी करण्याचे हे काम बेदरकारपणे सुरु असते व त्यामुळे डझनावारी प्रकरणे मा. उच्च न्यायालयापूढे गेलीत. अनेक प्रकरणात सहसंचालकांचे आदेश मा. उच्च न्यायालयाने रद्द ठरविले, अनेक प्रकरणात त्यांना व्यक्तीशः रकमेचा भरणा ठोठावण्यात आला. अनेक प्रकरणी १२ टक्के व्याजासह रक्कम परत करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिले. सतत होत असलेल्या या बेबंदशाही कारभारामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून सहसंचालकांच्या स्तरावरील हा मनमानी कारभार एकूणच तिरस्काराचा विषय झाला आहे. या स्थितीला पायबंद घालण्याच्या दृष्टीने शासनाने आदेश काढून तावडतोबीने पुढील उपाययोजना करावी अशी मागणी करण्यात येत आहे. :-

**संघटनेच्या जिल्हा कार्यकारिणी व तालुका कार्यकारिणीच्या तातडीच्या सभा**

संघटनेच्या जिल्हा कार्यकारी मंडळांच्या व तालुका कार्यकारी मंडळांच्या तातडीच्या बैठकी आयोजित करण्यात याव्यात. जिल्हा पदाधिकाऱ्यांनी व तालुका पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या जिल्ह्यामध्ये व तालुक्यामध्ये दौरे आयोजित करुन उपरोक्त मेळावे/ आंदोलन यशस्वी करण्यासाठी कार्यरत व्हावे **अशी विनंती करण्यात येत आहे. - डॉ. अनिल ढगे, सचिव "नुटा"**

(१) आपणच घेतलेले निर्णय एकदा घेतल्यानंतर आपले आपणच आपल्या पातळीवर सकाळ-संध्याकाळ बदलविण्याचे सहसंचालक कार्यालयाचे अधिकार (जे न्याय तत्वाच्या विरोधी आहेत) ताबडतोब काढून घेण्यात यावेत.

(२) सहसंचालकांना एखाद्या शिक्षकाच्या "सहीशिक्क्यानिशी मान्य करुन दिलेल्या अस्तित्विय वित्तलब्धी"मध्ये रिकव्हरी काढण्याची गरज आहे असे वाटल्यास ज्या पूर्वीच्या अधिकाऱ्यांनी सहीशिक्क्यानिशी ती उपलब्धी मान्य करुन दिली होती त्या अधिकाऱ्याला सहसंचालकांनी "ही जादा रक्कम कोणत्या नियमानुसार दिली?" याबाबतची कारणे दाखवा नोटीस द्यावी.

(३) आजच्या सहसंचालकांनी दिलेली कारणे दाखवा नोटीस व पूर्वीच्या अधिकाऱ्यांनी त्या कारणे दाखवा नोटीसला दिलेली उत्तरे ही सर्व कागदपत्रे संबधीत शिक्षकांकडे पाठवून "त्याने कोणती असत्य माहिती देऊन ही जादाची वित्तलब्धी पदरात पाडून घेतली" ते कागदपत्रासह त्याचेकडे पाठवून 'रिकव्हरी' बाबतची कारणे दाखवा नोटीस त्याला देण्यात यावी व संबधीत शिक्षकाच्या जबाबासह ही सर्व कागदपत्रे सहसंचालकांनी मा. संचालकांकडे पाठवावीत.

(४) पूर्वोक्त परिच्छेद २ व ३ मध्ये नमूद असलेली कागदपत्रे विचारात घेऊन मा. संचालकांनी याबाबत अंतिम निर्णय घ्यावा. म्हणजे जे काय निर्णय होतील ते राज्यभर सारखे होतील. प्रत्येक सहसंचालकांच्या राज्यात वेगवेगळे निर्णय होण्याच्या आजच्या प्रकाराला त्यामुळे आळा बसेल.

(५) एखाद्या शिक्षकाने चुकीची किंवा असत्य माहिती पुरवून एखादा लाभ पदरात पाडून घेतला असेल तर त्याच्या कडून त्याबाबत रिकव्हरी करण्यास संघटनेचा कोणताही विरोध असण्याचे काहीही कारण नाही. मात्र असे करतांना कायद्याच्या विहित प्रक्रियेचे उपरोक्त अनुपालन आवश्यक मानले पाहिजे. उपरोक्त प्रमाणे मागणी करण्यात .येत आहे.

**(४)** शासनाकडे वेळोवेळी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ज्या इतर मागण्यांविषयी दिलेली निवेदने व त्यामधील समाविष्ट असलेल्या प्रमुख इतर मागण्याबद्दल.

**(४.१)** केंद्रीय मानवसंसाधन विभागाने दि. ३१ डिसेंबर २००८ रोजी निर्गमित केलेल्या वेतनपुनर्रचना आदेशानुसार महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी 'समग्र योजने'ची काटेकोर अंमलबजावणी करावी.

**(४.२)** समाजकार्य महाविद्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षकांना दिनांक २२ सप्टेंबर २०११ रोजी, म्हणजे २५ महिन्यांच्या विलंबाने, सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तथापि या निर्णयात १.१.२००६ ते ३१.३.२०१० या काळातील देय थकबाकीसंदर्भात करण्यात आलेली तरतुद दिनांक २६ ऑगस्ट २००९ रोजी मुख्य सचिवांसोबत झालेल्या बैठकीतील निर्णयाशी व १२ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयाशी विसंगत व भेदभावपूर्ण असल्यामुळे सदर विसंगती व भेदभाव दूर करुन दिनांक २२ सप्टेंबर २०११ च्या शासन आदेशामध्ये यथोचित दुरुस्ती त्वरीत करण्यात यावी.

**(४.३)** एआयसीटीई व केंद्रीय मानव संसाधन विभाग यांचेकडून सहाव्या वेतन आयोगाबद्दल आदेश प्राप्त झाले असल्याने राज्यातील सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाचे लाभ देण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

**(४.४)** राज्यातील अनुदानित अशासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत महाराष्ट्र शासनाचा शासननिर्णय दिनांक २४ नोव्हेंबर २०११ रोजी निर्गमित करण्यात आला. सदर शासननिर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयाशी व दि. २६ ऑगस्ट २००९ रोजी झालेल्या मतैक्य पत्राशी विसंगत असल्यामुळे त्यांत आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात याव्यात.

**(४.५)** मा. उच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये दिलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना पाचव्यावेतन आयोगानुसार रु. १४९४० चे वेतननिश्चिती व कुंठीत वेतनवाढीचे लाभ त्वरीत देण्यात यावेत.

**(५.१)** मा. सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निर्णय, त्या आधारावर अनेक उच्च न्यायालयांनी दिलेले निर्णय, तात्पुरत्या शिक्षकांची सेवासुद्धा नेमणूकीच्या तारखेपासूनच धरली पाहिजे हे विद्यापीठ अनुदान आयोगाचे गेल्या अनेक वर्षापासून अस्तित्वात असलेले नियम, गेल्या १०-१५ वर्षात उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रात निर्माण करुन ठेवलेली स्थिती, आता खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ८ जुलै, २०११ रोजीच्या बैठकीत

फक्त महाराष्ट्रासाठी निर्णय घेवून स्पष्ट शब्दात या प्रत्येक शिक्षकांची सेवा नेमणूकीच्या दिनांकापासून धरावी असा दिलेला निर्णय, १६ ऑगस्ट, २०११ व २६ ऑगस्ट, २०११ च्या पत्राने तो निर्णय कळविणे "विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख कळवेल त्या तारखेपासून त्या सर्व शिक्षकांची सेवा धरली जाईल" अशी महाराष्ट्र शासनाने अनेकवार दिलेली लेखी आश्वासने, खुद्द मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी व प्रधान सचिवांनी "नेमणूकीच्या दिनांकापासूनच ही सेवा धरावी लागेल" अशी स्पष्टपणे घेतलेली भूमिका, लक्षात घेता एका उपसचिव दर्जाच्या कपटी व कारस्थानी अधिकाऱ्याने सबंध महाराष्ट्राचे उच्च शिक्षण क्षेत्र वेठीस धरावे ही आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट आहे. या व इतर अनेक प्रश्नामुळे शिक्षकांमध्ये असलेल्या असंतोषाला वाचा फोडण्यासाठी व या उपसचिवांच्या कारवाया हाणून पाडण्यासाठी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ कटीबद्ध असून पुढील आंदोलनाचा कार्यक्रम जाहिर करीत आहे. :-

**(५.२) रविवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१२ पूर्वी :-**

(१) राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. उच्च शिक्षण मंत्री यांना महासंघाचे अध्यक्ष व सचिव पत्राद्वारे ठरावाची प्रत सादर करतील.

(२) या कालखंडामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी संलग्न असलेल्या सर्व विद्यापीठस्तरीय संघटना आपआपल्या मुखपत्राचा "आंदोलन विशेषांक" प्रकाशित करतील. या विशेषांकामध्ये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने सम्मत केलेला आंदोलनाचा ठराव व तो ठराव राज्याचे मा. मुख्यमंत्री व मा. उच्च शिक्षण मंत्री यांना सादर करणारे पत्र, शब्दशः प्रकाशित करण्यात येईल.

(३) त्याच विशेषांकात जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरीय मेळाव्यांचा कार्यक्रम प्रकाशित करण्यात येईल. या अंकात प्रसिध्द करावयाचा आंदोलन विषयक इतर मजकुर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या किंवा त्या त्या विद्यापीठस्तरीय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ठरविल्याप्रमाणे असेल.

**(५.३) मंगळवार, दिनांक २१ फेब्रुवारी ,२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता सर्व विद्यापीठाच्या कार्यालयावर मोर्चे काढून निदर्शने करण्यात येतील.**

(१) शासनाने ७ ऑगस्ट, २००९ रोजी विद्यापीठांना एक परिपत्रक पाठवून "(ii) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबिर आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. (iii) विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करील, त्या तारखेपासून सूट देण्यात येईल." असे यापूर्वीच कळविले आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना या दोनही बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र आता प्राप्त झालेले असल्याने शिबिरांचे आयोजन करुन या सर्व शिक्षकांच्या बाबतीत स्थाननिश्चिती व वेतननिश्चितीची कारवाई विद्यापीठांनी पुढील १५ दिवसात पूर्ण करावी.

(२) मुळ शासननिर्णयात विद्यापीठांकडे हे अधिकार शासनाने सोपविले असल्यामुळे शासनाच्या यापूर्वी देण्यात आलेल्या उपरोक्त सूचनाप्रमाणे काही विद्यापीठामध्ये स्थाननिश्चिती व वेतननिश्चितीची कारवाई पूर्ण झालेली असून अशी प्रकरणे सहसंचालकांकडे सोपविली आहेत.

काही विद्यापीठांनी अशा नेट-सेट ग्रस्त शिक्षकांची सेवा नेमणूकीच्या पहिल्या दिनांकापासून धरून स्थाननिश्चिती व वेतननिश्चितीचे काम पूर्ण केलेले आहे. ज्या विद्यापीठांनी हे काम पूर्ण केले असेल तेथे कुलगुरूंना निवेदन देवून त्याबद्दल संघटनेतर्फे आभार मानले जातील. ज्या विद्यापीठांनी हे काम सुरु केले नसेल किंवा सुरु केले पण पूर्ण केले नसेल तर त्यांनी ते पुढील १५ दिवसामध्ये शिबीरांचे आयोजन करून पूर्ण करावे अशी त्यांना विनंती केली जाईल. १५ दिवसात याबाबत विद्यापीठ स्तरावरील कारवाई पूर्ण न झाल्यास त्या कुरुगुरुंशी संपूर्णपणे असहकार्य करण्याचे धोरण स्विकारले जाईल व त्याची सुरुवात म्हणून त्या विद्यापीठाचे कुलगुरू त्या विद्यापीठाच्या क्षेत्रात कोणत्याही समारंभास उपस्थित राहतील त्या प्रत्येक ठिकाणी संघटनेतर्फे निदर्शनांचा कार्यक्रम आयोजित केला जाईल.

**(५.४) प्रत्येक विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकांच्या कार्यालयावर २१ फेब्रुवारी, नंतरच्या प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता संघटनेतर्फे तीव्र निदर्शने केली जातील.**

विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र आल्यानंतर व येण्यापूर्वी अशा एक्झमशन मिळालेल्या शेकडो प्रकरणी विभागीय सहसंचालकांनी नेमणूकीच्या दिनांकापासून सेवा धरून वेतन निश्चिती करून प्रत्यक्ष वेतन देणे सुरु केले आहे. कायद्याप्रमाणे व नियमाप्रमाणे त्यांनी हे काम केलेले असले तरी अनेक प्रकरणी भ्रष्टाचाराचे हेतू मनात ठेवून "रिकव्हऱ्या" काढण्याचा प्रयत्नहि करण्यात आला. शेकडो शिक्षकांच्या प्रकरणी मुंबई खंडपिठाने दिनांक ३ सप्टेंबर, २०१० रोजी (W.P.1893 of 2010) व त्यानंतर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने (W.P.1991 of 2011) २८ मार्च, २०११ रोजी सहसंचालकांचे हे आदेश रद्दबादल ठरविले. *(2011NBP38)* काही मोजक्या बाबतीत कारवाई पार पाडावयाची व शेकडो प्रकरणे पाडून ठेवावयाची या सहसंचालकांच्या धोरणाचा निषेध म्हणून ही निदर्शने दर सोमवारी दुपारी ४.०० वाजता केली जातील.

**(५.५) दिनांक २५ जानेवारी ते २५ फेब्रुवारी या काळात**

**(i)** या कालखंडात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या जिल्हा मेळाव्यांचे आयोजन केले जाईल. अ.न. जिल्ह्याचे नाव, मेळाव्याचे ठिकाण, मेळाव्याचा दिवस, दिनांक व वेळ यांचा समावेश असलेला महाराष्ट्रातील या सर्व जिल्हा मेळाव्यांचा कार्यक्रम हा आंदोलन विशेषांकामध्ये प्रकाशित केल्याप्रमाणे असेल. या सर्व जिल्हा मेळाव्यांना विद्यापीठस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील.

**(ii)** जिल्हा मेळाव्यांचा कार्यक्रम ज्या कालखंडात होत आहे त्याच कालखंडात विद्यापीठस्तरीय मेळाव्यांचे आयोजन विद्यापीठ स्तरीय संघटनेकडून केले जाईल. या मेळाव्याला राज्यस्तरीय संघटनेचे पदाधिकारी व नेते संबोधित करतील. या मेळाव्याचा कार्यक्रम महासंघाचे अध्यक्ष व सचिव यांनी ठरविल्याप्रमाणे असेल. कोणत्याही परिस्थितीत हा कार्यक्रम २५.०२.२०१२ या तारखेच्या पुढे जाणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

**(iii)** या १०-१२ दिवसाच्या कालखंडामध्ये जिल्हास्तरीय नेते आपापल्या जिल्ह्यामध्ये आंदोलनाच्या प्रचारासाठी दौरे करतील.

**(५.६)** गुरुवार, दिनांक १ मार्च, २०१२ रोजी दुपारी १२.०० वाजता आझाद मैदान मुंबई येथे राज्यस्तरीय धरणे आंदोलन करण्यात येतील

**(५.७)** गुरुवार, दिनांक १ मार्च २०१२ पासून महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक, मा.उच्च शिक्षण मंत्रिमहोदयांनी जिल्ह्याच्या ठिकाणी सार्वजनिक समारंभात/कार्यक्रमात सहभाग घेतला असेल तर त्या समारंभ स्थळी/कार्यक्रम स्थळी नोकरशाहीच्या मनोवृत्तीचा धिक्कार म्हणून व अशा मनोवृत्तीला आवर घालण्यास शासनाला आलेल्या अपयशाच्या विरोधात महासंघातर्फे तीव्र निदर्शने केली जातील.

***FS : P 02 ***

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **23.01.2012**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

To,..........................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................